

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २८

REFBK-0001261

ता........

नासिक शाखा

१२६१

REFBK-0001261

॥ श्रीउद्योगदेवता प्रसन्न. ॥

ज्ञानमित्र पुस्तकमाला पुष्प तेरावें.

# ब्रम्हचर्याश्रम.

लेखक;

महाराष्ट्रभाषाचित्रमयूर,

कृष्णाजी नारायण आठल्ये;

एडिटर, केरळकोकिळ व नवे–मन्वंतर.

प्रकाशक व मुद्रक,

नारायण बळवंत चव्हाण.

प्रथमावृत्ति.

किंमत चार आणे. ]          [ सन १९१६.

( *All Rights reserved by the Publisher.* )

हें पुस्तक पुणें पेठ शनवार घर नंबर ४०७ येथें, नारायण बळवंत चव्हाण यांनीं आपल्या " हरिहर " नामक छापखान्यांत छापून ज्ञानमित्र कचेरी, शनवार पेठ, घर नंबर ४०८ येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

बीं कितीही चांगलें असले व जमीन कशीही सुपीक असली तरी जमिनीची नांगरणी वगैरे मेहनत मशागत ही आधीं करावीच लागते. इतकेंच नव्हे तर पीक आल्यावर सुद्धां भांगलण वगैरे करून त्यांतील गदळ काढून टाकून पीक निर्मळ राखावें लागतें. तद्वत् विद्या व ज्ञान कितीही चांगलें असलें तरी तिचें ग्रहण करण्याची भूमी जें अंतःकरण तें सद्बोधानें निर्मळ व पवित्र केलेंच पाहिजे. विद्या व ज्ञान हे मनुष्याच्या अंतःकरणांत रुजणारें उत्तमोत्तम बीज आहे. व ब्रम्हचर्यव्रत पाळणें हीच त्या अंतःकरणरूप भूमिची नांगरणी, कुळपणी व भांगलण आहे. ती जितकी जितकी चोख करावी तितके तितकें पिक जोमदार व कसरदार येणार ही गोष्ट सर्वांना समजण्या सारखी आहे.

आपल्याला अंतःकरणरूपी क्षेत्र परमेश्वरानें दिलें आहे, व त्यांत पेरण्याचे उत्तमोत्तम व निवडक बीं आपल्या दयाळू सरकारानें देण्याचें काम मनः पूर्वक आंगीकारलें आहे. हा लाभ सामान्य नव्हे. आतां हलक्या उद्योगीं लोकांनीं व आमच्या सारख्या मजुरांनीं कां ह्मणाना, त्यांतील नांगरणीचे व भांगलणीचें तरी काम करणें अवश्य आहे. हाच हेतू मनांत धरून विद्या

ज्ञानामृतास अत्यंत सहाय भूत जे ब्रह्मचर्यव्रत ते कसें पाळावें ह्या विषयीं वाचलेलें, ऐकलेलें व सुचलेलें विचार ह्यांत संक्षेपतः दाखल केलें आहेत. ते जर आमचे होतकरू विद्यार्थी आदर पूर्वक वाचतील व त्या प्रमाणें वागतील किंवा निदान वागण्याचा प्रयत्न तरी करतील तर त्यांस आनुपम लाभ होऊन पुढील सारा जन्म सुखसौख्यांत जाईल. पुस्तक लहान असलें तरी त्याचें कार्य व फल मोठें आहे, तें सर्व बाल विद्यार्थ्यांसच चाखावयास मिळावें व त्यांच्या रसास्वदानें त्यांच्या अंतःकरणास स्फुर्ति यावी अशी पुस्तक कर्त्याची व प्रसिद्ध कर्त्याची इच्छा आहे; ती तो जगधीश्वर पुरी करो, येवढेंच त्याच्यापाशीं मागणें आहे, दुसरें काय ?

पुणें शहर.
२ जुलै, १९१२.

सर्वांचा नम्र सेवक,
कृ. ना. आठल्ये.

# अर्पणपत्रिका.

सुप्रसिद्ध राजर्षीचे चिरंजीव

श्रीमंत रा. रा. गंगाधर श्रीनीवास

ऊर्फ

तात्यासाहेब पंतप्रतिनिधि

संस्थान औंध

ह्यांची धर्मनिष्ठा, सदाचार, ईश्वर भजनप्रेमा,

वेदांत काव्य प्रसाद, सात्विक वृत्ति, इत्यादि

अनेक सद्गुणांवर लुब्ध होऊन त्यास

त्यांच्या परवानगीनें हें पुस्तक

प्रेमनम्रता पूर्वक अर्पण

केलें आहे.

लेखक व प्रकाशक.

ग्रंथ संग्रहालय

# ब्रह्मचर्याश्रम.

ब्रह्मचर्य व्रत धरणें । ब्रह्मवर्चस्व चढे तेणें ॥
सद्गुरूचेनि भजनें । निष्पाप होणें तितजवृति ॥१॥ *

—एकनाथी भागवत, अ० १७

## धार्मिक स्वरूप—

पाश्चिमात्य लोक म्हणा, किंवा त्यांच्या वाङ्मयांत तल्लीन झालेले आमचे लोक म्हणा ह्यांनीं कांहीं जरी म्हटलें तरी, आमच्या प्राचीन श्रुतिस्मृतिकार पूर्वजांनीं आचार-विचारासंबंधानें सामाजिक बाबतींत जे नियम घालून दिले आहेत, ते हल्लीं सुधारलेल्या म्हणविणाऱ्या राष्ट्रांच्या अगदीं तंतोतंत तोडीचे किंबहुना अधिकच दूरदर्शीपणाचे आहेत. ह्यांत आम्हांस तर तिळमात्र संशय वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर ज्या पाश्चिमात्य लोकांनीं हल्लीं नव्या नियमांची म्हणून स्थापना केली आहे, त्यांतही आमच्या प्राचीन नियमांचें बीज हें आहेच; आणि तेंही एकाद्या बाबतींत नव्हे, तर हरएक बाबतींत. उदाहरणार्थ, केंत्रि-

* ब्रह्मचर्य व्रत धारण केलें म्हणजे त्याच्या आंगांत ब्रह्म-तेज चढतें, आणि सद्गुरूच्या सेवेनें वृत्तीही निर्दोष बनते.

जच्या विश्वविद्यालयांत वगैरे जे विद्यार्थी असतात, त्यांनीं गुरुगृहीं वास करावा अशी तेथें आजमित्तीस पद्धत सुरू आहे; पण तिच पद्धत आमच्या हिकडे पूर्वींच चालू होती; व त्यासच ब्रह्मचर्यव्रत असें म्हणतात. हें व्रत निदान एक तप म्हणजे बारा वर्षें तरी पाळावें लागे; व तेथें कसें वागावयाचें त्याचे नियम तर त्यांनीं एखाद्या पिनलकोडाप्रमाणें कायदेच ठरवून टाकले होते; पण हेच नियम थोड्या सुधारलेल्या रितीनें म्हणा, किंवा कांहीं कालमानाप्रमाणें फेरफार करून म्हणा, त्यांनीं अमलांत आणले, आणि आम्हीं ते सारेच झुगारून देऊन कफल्लक होऊन बसलो, येवढेंच काय तें अंतर !

शिवाय आमच्या ह्या श्रुतिस्मृतिकारांच्या आचार-विचारांच्या नियमांत आणखी एक मोठा दूरदर्शीपणा आढळून येतो. तो हा कीं, त्यांनीं आमच्या ह्या नियमांना आरोग्यशास्त्राच्या पायावर उभारून ते कायमचे पाळलें जावेत, म्हणून त्यांस धार्मिकरूप दिले आहे. त्यामुळें ते नियम मोडण्यास प्राकृत मनुष्यास मोठें भय वाटतें; आणि त्याच कारणानें त्याना चिरस्थायित्व येतें. उदाहरणार्थ, समाजाच्या हिताकरितां पातिव्रत्य धर्म पाळला पाहिजे, हा दाब कोणीकडे, आणि पातिव्रत्य धर्म हा प्राणांत समयापर्यंत पाळणें हेंच आपलें कर्तव्य असें समजणारा दाब कोणीकडे ? तात्पर्य, आमच्या धर्म बंधनांचा दाब इतका प्रबळ असतो कीं, पतिबरोबर सती

जाण्याचें सुद्धां स्त्रिया पतकरतात; परंतु त्याच्या पश्चात् आपण जगावें ही कल्पना सुद्धां त्यांना बरी वाटत नाहीं. येथपर्यंत धार्मिक भक्तीची मजल येऊन ठेपते.

## आश्रम—

आपण जन्मास आल्यानंतर मरण कालपर्यंत कसकसे वागावें, कोणकोणत्या मार्गास अनुसरावे, ह्याबद्दल आमच्या शास्त्रकारांनीं चार विभाग केलेले आहेत. त्यांना आश्रम असें म्हणतात. मूल जन्मास आल्यापासून तों त्यास नीट समजूं लागेपर्यंत तें निखालस अज्ञान दशेंतच असल्यामुळें तें केवळ परस्वाधीन असतें. त्याला कामक्रोध इत्यादि विकारांचा प्रबळ संस्कार नसतो. हीच कौमार्य दशा होय. म्हणून तींत त्यानें कसें वागावें ह्याबद्दल सांगण्याचें कांहीं प्रयोजनच नाहीं; आणि शास्त्रकारांसही त्या दशेचा विचार करण्याचें कारण नाहीं. त्या दशेंत मुलाकडे कांहींच कर्तव्य नसून त्याचें सारें कर्तव्य मातापितरांकडे असतें. ह्या बाल्यदशेंतील मनुष्य केवळ निर्विकार असल्यामुळें, त्याच्याठिकाणीं आपपर भाव नसतो. म्हणजे त्याची वृत्ति केवळ साधुसारखी असते. म्हणून येशूख्रिस्तानें म्हटलें आहे कीं "मला मुलें फार आवडतात. त्यांच्यासारखे तुम्ही व्हा" अर्थात् तशी साधुवृत्ति स्वीकारा. ह्याचा ध्वनितार्थ हाच आहे; परंतु ह्यापुढें मात्र मनुष्याला समजूं लागतें. त्यास आपण पुढें कसें वागावें, हेंही शिकावें लागतें; म्हणून मातापितरें त्यास

शाळेंत घालतात; विद्याभ्यासास लावतात. ह्याच संस्काराला "उपनयन, मौंजीबंधन" किंवा 'व्रतबंध' अशीं नावें आहेत. व्रतबंध झाल्यापासून विवाह होईपर्यंत जो काल त्याला 'ब्रम्हचर्य' असें म्हणतात. उपनयन संस्कार झाल्यापासून म्हणजे विद्याभ्यासास प्रारंभ झाल्यापासून तों विवाह होईपर्यंत गुरूगृहीं वासकरून शास्त्रानें किंवा गुरूनें सांगितलेल्या नियमाप्रमाणें वागणें, ह्यालाच 'ब्रम्हचर्याश्रम' असें म्हणतात. दुसरा गृहस्थाश्रम. विवाह झाल्यापासून पत्नीसह वर्तमान मुलांबाळांसह सांगितलेल्या नियमाप्रमाणें वागून संसार करणें ह्याला 'गृहस्थाश्रम' असें म्हणतात. तिसरा वानप्रस्थाश्रम. आपलीं मुलेंबाळें मोठीं होऊन कर्तींसवर्ती झालीं म्हणजे सर्व प्रपंचाचा भार मुलांवर सोपवून पत्नी असल्यास पत्नीसह वर्तमान अरण्यवासांत सर्वसंग परित्याग करून राहणें ह्याला 'वानप्रस्थाश्रम' असें म्हणतात. चवथा संन्याशाश्रम, किंवा चतुर्थाश्रम. पत्नी असल्यास तिच्या अनुज्ञेनें किंवा नसल्यास आपण होऊनच सर्वसंग परित्याग करून काषायवस्त्रें परिधान करून हातांत दंडकमंडलू घेऊन मरणकालपर्यंत देशाटन करित भिक्षान्नावर उपजीविका चालवून जनांस उपदेश करणें ह्याला 'संन्याशाश्रम' असें ह्मणतात. हे चार आश्रम यथातथ्य रीतीनें आपणाकडून पाळले गेले, म्हणजे आपल्या जन्माची इतिकर्तव्यता संपली अशी आपल्या प्राचीन लोकांची किंवा शास्त्रकारांची समजूत होती.

## ब्रह्मचर्याचा आरंभ—

परंतु आपल्याला ह्या पुस्तकांत आज ह्या चार आश्रमांपैकीं फक्त ब्रह्मचर्याश्रमाचा मात्र विचार कर्तव्य आहे. ब्रह्मचर्याचा आरंभ म्हणजे सज्ञान होऊन विद्याभ्यासास लागण्याचा काल होय. ह्या काळाच्या आरंभीं विशेषेंकरून ब्राह्मण ज्ञातींत उपनमन--मुंज--किंवा व्रतबंध ह्या नांवाचा संस्कार करण्याची चाल आहे. हा संस्कार आपआपल्या शक्तीमानाप्रमाणें, ऐपतीप्रमाणें व हौशीप्रमाणें जो तो मोठ्या समारंभानें करित असतो. निदान हल्लीं तरी तो खास करतातच; पण त्यांत मूळ हेतु एकीकडेच राहून शिष्टाचाराचेंच प्राबल्य समजतें आणि खऱ्या खुऱ्या व्रतबंधाचा मागमोसही उरत नाहीं.

ह्यावरून ब्रम्हचर्याचा आरंभ म्हणजे विद्याभ्यासाचा आरंभ होय, हे तर उघडच आहे. तेव्हां तो काल कोणता ? व तें व्रत धरणें कोणकोणास अवश्य आहे ? हा प्रश्न पुढें येतो. परंतु विद्याभ्यास ह्याचा अर्थ केवळ लिहिणें वाचणें असाच घेऊन चालावयाचें नाहीं. तर आपण पुढें जगांत वागावयाचें कसें, आपलें हित कशांत व अहित कशांत ? सत्कर्म कोणतें, व असत्कर्म कोणतें ? कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें ? हें जाणून घेणें ह्याची शिक्षा किंवा दीक्षा घेणें हाच विद्याभ्यास होय. असा विद्याभ्यास नको कोणाला ? ब्राह्मण असो, क्षत्रिय

असो, कीं वैश्य असो; शूद्र असो कीं अति शूद्र असो. हा विद्याभ्यास प्रत्येक जातीला हितकरच आहे–परंतु कित्येक–अगदीं थोड्या कां होईनात–अशा जाती आढळतील कीं, त्यांना अशा प्रकारच्या विद्याभ्यासाची कल्पनाही नाहीं. मुलगा थोर झाला कीं, त्यानें हळुहळू आपल्या कामास हातभार लावावयाचा, आणि तो आपला धंदा, मोलमजुरी किंवा रीतीभाती करतां करतांच व्यवहारांत जेणेकरून त्याला ज्ञान प्राप्त होईल तेंच त्याचें शिक्षण; आणि त्यावरून जो त्याचा स्वभाव बनेल, तेंच त्याचें शिल. अशा लोकांच्या विद्याभ्यासालाच जर मुळीं ठिकाण नाहीं, तर त्यानां उपनयन संस्कार तरी कशाचा आणि व्रतबंध तरी कशाचा ? परंतु इतक्या खालच्या प्रतीचे लोक फारच थोडें असतात. आपल्या मुलाचा कांहीं तरी विद्याभ्यास व्हावा, थोडें बहुत तरी लिहितां वाचतां यावें, व कांहीं तरी हिशोबठिशोब समजावेत अशी इच्छा बाळगणारेच लोक फार.

## हल्लींच्या विद्याभ्यासाचे स्वरूप—

आपल्या देशामध्यें ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्या चार जाती तर हल्लींच्या काळीं आपल्या मुलांकडून अवश्य विद्याभ्यास करवितात. शूद्रामध्यें कांहीं कमी आढळतील ही गोष्ट खरी; पण आलीकडे अति शूद्रांत ही विद्येची अभिरुचि उत्पन्न होत चालली आहे. व

त्या कामीं पुष्कळ राजेरजवाड्यांसारखे लोकही त्यांस अतः-करण पूर्वक सहाय करित आहेत. तेव्हां विद्याभ्यासाचा आरंभ सांप्रतकाळीं कोणाच्या मुलांना नाहीं असें बहुधा नाहींच. सर्वांनांच तो आहे. आतां ज्यांच्या विद्याभ्या-साच्या आरंभाच्यावेळीं मौजींबंधन, ब्रह्मचर्य व्रताचा समारंभ वगैरे करतात किंवा तन्निमित्त कांहीं संस्कार म्हणून त्यांच्यामध्यें होतो, अशा जाती पूर्वींपासून ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन तर खास आहेतच. विद्याभ्यासाचा आरंभ म्हणजे मुलगा शाळेंत घालण्याचा समारंभ हा हल्लीं इंग्रजी सुरूं झाल्यापासून आहे असें नाहीं, तर अगदीं तात्या पंतोजीपासूनच 'सरस्वती मायबहिणी, कुंवारिणी, ब्रम्हचारिणी' हा मंत्र पाठ आहे ह्याबद्दल शंका नाहीं. व्रतबंधाचा किंवा ब्रम्हचर्याचा जो विधि आहे, तो विद्याभ्यासा करतांच आहे ही गोष्ट खरी; पण तो विद्याभ्यास म्हणजे हल्लींच्या काळच्या समजुनीप्रमाणें लिहिणें वाचणेंच केवळ नव्हे, तर तो उच्चप्रतीच्या शिक्षणा-करतां आहे परंतु हल्लींच्या उच्चप्रतीच्या शिक्षणांत व पूर्वींच्या उच्चप्रतीच्या शिक्षणांतही मोठा फरक आहे. हल्लीच्याकाळीं बी. ए.; एम्. ए.; एल्. एल्. बी.; एल्. सी. ई.; ब्यारिष्टर ऍटलॉ; रँगलर; ह्या पदव्यांच्या पाठीस लागा-वयाचें आणि त्या एकदां मिळविल्या म्हणजे 'कृतकृत्य-श्चभारत' झालें. इतक्यांतूनही पार पडावयाला कांहीं कमी श्रम पडतात असें नाहीं. कशीं तरीं दहा बारा वर्षें

तरी लागतातच आणि शिवाय, पाण्यासारखा पैसा ओतावा लागतो तो वेगळाच. हिंदुस्थानांत पैसा खर्च होतो तो होतोच, पण कित्येक परीक्षा देण्याकरितां विलायतेचीच यात्रा करावी लागते; आणि त्यांत हजारों रुपये खर्ची पडतात; आणि तितक्याचा मोबदला मिळ-ण्याची बहुधा मुष्कीलच पडतें. निदान हल्लींच्या काळांत तर नाहींच नाहीं. आणखी ह्या पदव्यांत अशी एक मौज आहे कीं, त्यापैकीं कितीएक पदव्या विलायतेंत पाहिजे त्याला विकत मिळतात! म्हणजे अमुक एक हजार, दोन हजार किंवा पांच हजार रुपये भरले कीं, बी. ए.; एम्. ए.; ही पदवी सरकारांतून मिळते, मग त्या मनुष्याचा अभ्यास तितका नसला तरी चालतो. अशा प्रकारें आजच्यासारख्या चवचाल युगांस विद्वत्तेच्या शिक्क्यांचा विकरा व्हावा ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. मग त्यांतील बीज काम असेल तें देणा-रासच माहित.

## पूर्वींचा विद्याभ्यास—

परंतु पूर्वींच्या विद्या निराळ्या; त्यांच्यांतील पदव्या निराळ्या; त्यांची पद्धत निराळी; व तिचें फलही पण निराळें. हा सारा प्रकार हल्लींचा व पूर्वींचा अगदीं उलट सुलट झालेला आहे म्हटलें तरी चालेल. हल्लीं जी विद्या शिका-वयाची, तिच्यासाठीं आपल्या भाषेच्या व्याकरण निय-

माशी केवळ छत्तीसाचा आंकडा अशी जी पाश्चात्य भाषा, ती शिकणें हा पहिला धडा, आणि प्राचीनकालचे लोक तर तिला ' म्लेंच्छ भाषा ' असें म्हणत असत; व ती प्राण गेला तरी शिकत नसत. त्यांची भाषा दिव्य म्हणजे गीर्वाण--तिलाच संस्कृत म्हणजे परीपूर्णतेस पोंचलेली असें ह्मण. तात. त्याच भाषेतून सर्व ज्ञान संपादन करावयाचें. त्यांच्या पद्व्याही निराळ्याच असत. दशग्रंथी; जटापाठी; घनापाठी; षट्शास्त्री; वेदोनारायण; शास्त्रकार, भाषाकार, टीकाकार, एकपाठी, शीघ्रकवि इत्यादि होत. म्हणजे एकंदरींत वेदाध्यान, शास्त्राध्यान, शास्त्राभ्यास, ह्यालाच प्राचीनकाळीं उच्च प्रतीचा विद्याभ्यास म्हणत; आणि त्याच्या आरंभासाठींच ब्राह्मण लोक व्रतबंध, मोंजीबंन वगैरे संस्कार करित. म्हणून ब्रम्हणेतर लोक बहुधा तो करित नसत. खरें म्हटलें म्हणजे सर्वांनींच ब्रह्मचर्य पाळणें अवश्य आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांना वेदाचा अधिकार आहे असें ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराज ह्यांनीं सुद्धां आपआपल्या ग्रंथांत स्पष्ट सांगितलें आहे. परंतु क्षत्रिय व वैश्य हे दोन वर्ण मौंजींबंधनाची व ब्रह्मचर्याची मुळी पर्वा करित नाहींत. क्षत्रिय लोक म्हणजे राजे वगैरे हे तर लग्नाच्या आधीं एकच दिवसांत हा समारंभ उरकून टाकतात. छत्रपति शिवाजी महाराजांस पट्टाभिषेकाच्या वेळीं मुंज न झाल्याची हरकत निघाली होती, व ती गागाभटजींनी

येऊन दूर केली व एका दिवसांत नवीन मुंज करून—अर्थात् लग्नें व मुलेंबाळें झाल्यानंतर—व सारा समारंभ आटोपून राज्याभिषेक केल्याचें इतिहासांत प्रसिद्धच आहे. वैश्य लोकांतील मुंजीचाही बहुधा असाच संक्षेप असतो. लग्नाच्या आधीं एखाद्या दिवशीं कोणी कांहीं तरी चुटपुटता संस्कार करित असतील तर कोण जाणे! पण बहुधा त्यालाही अर्ध चंद्रच.

## हल्लींचा संक्षेप—

तेव्हां अर्थात्च सांप्रतकाळीं हा मुंजीचा किंवा ब्रम्हचर्याचा समारंभ किंवा संस्कार जो कांहीं थोडाबहुत अवशेष राहिला आहे, तो ब्राम्हण लोकांतच राहिला आहे. पण तो सर्व त्यांच्या पोट जातींतही आहे, व होतो ही गोष्ट विसरतां कामा नयें. तेव्हां तो संस्कार ते सांप्रत कसा काय करतात व त्यांतील ब्रम्हचर्य कितपत पाळतात तें पाहूं. पण तें सारें अनुष्टपांतच आलेलें आहे. जसें काय, हल्लींचें सारें युगच संक्षेपाचें आहे म्हटलें तरी चालेल. कोणतीही गोष्ट किंवा विधी झाला तरी अगदीं थोडक्यांत ही संक्षेपाची चाल हल्लींच प्रचारांत येत आहे असें नाहीं, तर प्राचीन कालापासूनच हळुहळू घुसलेली आहे.

तेथें मौंजिबंधनाचा व ब्रह्मचर्याचा अती संक्षेप उडाला ह्यांत आश्चर्य तें काय ? ह्यासाठीं आज मित्तीला ब्राम्हण

लोक मौंजिबंधनाचा समारंभ व संस्कार कसा करतात व ग्रंथांतरी कसा करण्याबद्दल आज्ञा आहे, आणि हल्लींच्या मनूला त्यांतील कोण कोणता भाग अवश्य आहे तें सांगू आणि तो न पाळल्यामुळें कसें व केवढें नुकसान झालें आहे तें दाखवूं. म्हणजे ब्रह्मचर्याविषयीं वाचकांच्या मनांत बरीच कल्पना उतरेल.

## चुटपुटता समारंभ—

ब्राम्हण लोकांत जो मुंजीचा समारंभ करतात त्यांत दोन प्रकार आहेत. कांहीं लोकांना द्रव्याचा खर्च वगैरे करण्याची ऐपत नसते, किंवा ऐपत असून अधिक खर्च करावा असें वाटत नाहीं. ते लोक आपल्या गांवांत गांव प्रयोजन वगैरे घालण्याचा त्रास पडूं नये म्हणून नाशिक, नरसोबाचीवाडी वगैरे सारख्या क्षेत्रीं जाऊन पांच चार रुपयांत तो संस्कार आटोपून एकदोन दिवसांत परतही येतात. एक प्रकारें हेच लोक पुष्कळ बरे होत. कारण, ते हौशीच्या किंवा लोकाचाराच्या नादीं लागून निष्कारण खर्चाच्या पेंचांत तरी येत नाहींत; पण जे हौशी लोक असतात ते मात्र केवळ लोकांत वाहवा घेण्यासाठीं होईल तितका अधिक खर्च करून कर्जाचा बोजाही करून घेण्यास चुकत नाहींत. मग त्यांत खराखुऱ्या ब्रम्हचर्याचें नांव सुद्धां नसलें तरी चालतें. अशाप्रकारचे समारंभ म्हणजे ब्रम्हचर्य व्रताची केवळ थट्टाच होय.

## थाटामाटाची मुंज—

'उपनयन' ह्याचा शब्दशः अर्थ गुरूपाशीं जाणें असाच आहे. उपनयन विधी करण्याचा निश्चय झाला व त्याचा मुहूर्त ठरला म्हणजे त्या मुंज्याला आप्तइष्ट सोयरे धायरे यांजकडून केळवणें सुरू होतात. नंतर मुंजलागण्याच्या आदल्या दिवशीं घरचें केळवण होते. सायंकाळीं मोठ्या थाटानें अक्षतेची ताशे, वाजंत्री, ब्यांड वगैरे लावून मिरवणूक निघते. त्यांत नळे चंद्र-ज्योती वगैरे दारू कामाचा भपका करून आपले पैसे पाण्यांत घालावयाचें आणि दुसऱ्यांना त्या दारूच्या घाणीनें पांच चार महिन्यांचा खोकला अर्पण करावयाचा! असा ह्या उपनयनाच्या संस्कारांत सांप्रतकाळीं निरर्थक द्रव्याचा व्यय होऊन कित्येक लोक कर्जांतही बुडून जातात! खरोखर उपनयनाशीं किंवा ब्रम्हचर्याशीं ह्याचा अर्थाअर्थीसुद्धां कांहीं संबंध नाहीं.

ह्याशिवाय देवदेवक, घटकास्थापना, मातृभोजनाचा थाट, चौलविधि व नापिकाचा मान; शिवाय ऐपती-प्रमाणें त्याची बिदागी; भटाभिक्षुकांस दक्षणा गृहस्थांस पानसुपारी, अत्तर गुलाब व जेवणावळ; इत्यादि प्रकार होतातच. अहेर, भिक्षावळ, वगैरे सर्व कांहीं होतें. मुंज्याच्या कमरेस मुंज म्हणजे मोळाचा कटदोरा बांध-तात; पिंवळी कौपीन नेसावयास देतात; गळ्यांत कृष्णा-जिनयुक्त यज्ञोपवीत घालतात व हातांत पळसाचा दंड

देतात. अर्थात् ही ब्रह्मचर्याश्रमाची तयारी होय. नंतर त्यास गुरु ह्मणजे कुलोपाध्याय किंवा बाप वगैरे मुंज लावणाराही गायत्री मंत्राचा उपदेश देतो. नंतर अग्नि-कार्य वगैरे याज्ञिक विधी उरकतात, व रात्रौ भिक्षा-वळीचा समारंभ होतो. मुंज्या आपली झोळी पसरून ' ओंभवति भिक्षां देही ' असें तोंडानें म्हणतो व आप्त, इष्ट, ऐपतीप्रमाणें व नात्याप्रमाणें भिक्षा घालतात. नंतर देवकोत्थापन होतें. ह्मणजे उपनयनाचा संस्कार आटोपला.

## सोडमुंजीचा प्रकार—

उपनयन संस्कार झाल्यापासून मुंज्यानें ब्रम्हचर्य व्रतानें गुरुगृहीं वास केला पाहिजे; व त्याची समाप्ती नऊ किंवा बारा वर्षांनंतर करावयाची असें शास्त्रांत सांगि-तलें आहे. ह्या व्रतबंधाच्या समाप्तीलाच ' सोडमुंज ' असें नांव आहे, पण हल्लीं ही सोडमुंज पुरते बारा दिवस झाले नाहींत तोंच उरकून टाकतात ! किंवा तो विधी करा-वयाचा राहिलाच तर ब्रम्हचर्य व्रताचे कोणतेही नियम न पाळतां मुंज्या पाहिजे तसें स्वैर वर्तन करतो; आणि लग्नाच्या आदल्या दिवशीं तो विधि उरकतात. कारण, सोडमुंजीचा विधी झाल्यावांचून लग्न लावतां येत नाहीं. हल्लीं जो सोडमुंजीचा विधी करतात तो तर उपनयन संस्काराहूनही मौजेचा आहे. उपाध्याय येतो आणि एका घटके दोन घटकेंत कमरेस बांधलेली मोळाची मुंज

सोडून टाकतो. मुळांत असें आहे कीं, वेदाध्ययन संपलें म्हणजे गुरूची आज्ञा घेऊन काशीयात्रेस जावें. हाही नियम फार उत्तम व हल्लींच्या काळासही अनुसरून आहे. हल्लीं सुद्धां आमच्या देशांतील राजकुमार विद्याभ्यासाकरतां इंग्रज सरकारही राजकोटास गुरुगृहीं ठेवतें व तेथील अभ्यास पुरा झाला म्हणजे त्या विद्यार्थ्यांस बंगाल, काश्मीर, विलायत वगैरे ठिकाणच्या प्रवासास मुद्दाम पाठवितात. कारण, केवळ पढिक विद्येनेंच सारें व्यवहार ज्ञान येत नसतें. बहुश्रुतपणा येण्याला व दृष्टी समसमान व विकासित होण्याला अन्य देशाचा प्रवास अत्यंत अवश्य आहे. हाच नियम प्राचीन लोकांनींहि लक्ष्यांत घेऊन ब्रम्हचाऱ्यानें काशीयात्रेस जाण्याची योजना केली होती. त्याची फक्त नक्कल मात्र आतां सोडमुंजींत करून दाखवितात. ती अशी मुंज सोडण्याचा व याज्ञिकाचा विधी आटोपला म्हणजे मुंज्याची काशीयात्रेस जाण्याची तयारी करतात. पायांत नवा जोडा; हातांत काठी; डोळ्यांत काजळ; आंगांत आंगरखा; डोक्याला कानटोपी; खांद्यावर छत्री; काखेला पडशी; इतका सरंजाम घेऊन मुंज्या घरांतून बाहेर पडतो व गुरु किंवा उपाध्याय हेही त्याच्या बरोबरच असतात; परंतु ही त्याची मजल कोठपर्यंत ? तर फक्त दरवाजांतून बाहेर पडेपर्यंत तो दरवाज्याच्या बाहेर पडला कीं, उपाद्धेबुवा त्याला सांगतात कीं, " आपण कांहीं

आतां काशीयात्रेस जाण्याच्या भरीस पडूं नये. मी आपल्या मुलीशीं आपलें लग्न करून देतों. ह्याकरितां आपण आतां घरातच संसार करून गृहस्थाश्रम पालन करून रहावें." झालें, आटोपलें. लागलेच हे ब्रम्हचारी-बुवा परत फिरतात आणि घरांतील सर्व मंडळी जेवावयास बसतात. जेवणें होऊन दक्षणा हातावर पडली कीं, उपाद्धेबुवा आपल्या घरचा रस्ता सुधरतात. मुलगी देणें घेणें हें वचन जागच्याजाग्यावरच राहतें. पण ह्यांत आपण किती खोटें बोलतों व त्या मुलास किती फसवितों ही गोष्ट उपाद्धेबुवांच्या म्हणजे कुलगुरू म्हणविणाऱ्या गांवींही नसते. ह्यावरून एखाद्या संस्कारांत वचन देणें म्हणजे त्याला कांहींच किंमत नाहीं! व तसें बोलण्यांत कांहीं पातक होत असेल, ह्याचेंही भान नाहीं; आणि ही गोष्ट कोणाची? सामान्य मनुष्याची नव्हे, तर जो गायत्री मंत्रोपदेश देऊन आपल्याला गुरु म्हणवितो त्याची! ह्यापेक्षां आणखी शोचनीय गोष्ट ती कोणती असावयाची?

## हल्लींचा गुरुगृहवास—

येथपर्यंत आमच्यांतील मुंज व सोडमुंज ह्यांचा जो धार्मिक रितीनें विधी व संस्कार करतात त्याचा प्रकार सांगितला. त्यावरून धार्मिक रितीनें सुद्धां उच्च प्रतीचे लोक तो संस्कार यथाविधी पाळित नाहींत ही गोष्ट स्पष्टच झाली. केवळ जुन्या पद्धतीचा नामशेष राहिलेला

तो विधी, होय–म्हणूनच त्यापासून खरोखर ब्रह्मचर्यव्रत पाळण्याचा मुळींच लाभ होत नाहीं.

आतां जे विद्यार्थी हल्लींच्या कालमानाप्रमाणें विद्याभ्यास करतात, त्यांची वागणुक कशी असतें, व त्यापासून ब्रम्हचर्य व्रतास कांहीं पुष्टी मिळते कीं कांहीं हानी होते, त्याचा विचार करून मग आपल्या प्राचीन कालच्या ब्रम्हचर्यव्रताचे नियम काय काय आहेत, व त्यांपैकीं आपल्याला आज मित्तीस किती अवश्यक आहेत, आणि त्यांत कालमानाप्रमाणें फेरफार करणें अवश्य आहे कीं काय त्याचा विचार करून हल्लीं ही ब्रम्हचर्य अवश्य असल्यास तें कसें पाळावें हें ठरवूं. ह्मणजे ब्रम्हचर्याचा सांगोपांग उहापोह झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## अर्वाचीन शास्त्रें—

तेव्हां ह्यापुढें विचार करावयाचा ह्मणजे हल्लींच्या विद्येचा व विद्यार्थ्यांचा. पूर्वींचे लोक जिला विद्या म्हणून म्हणत होते, तिला हल्लीं विद्या असें मानित नाहींत; व त्या विद्येला हल्लीं विद्या असेंही पण कोणी म्हणत नाहीं. हाच आधीं कालमन्वंतराप्रमाणें मोठा फेरफार झालेला आहे. वेद पठण आणि शास्त्राध्यायन झालें म्हणजे मोठी विद्या झाली असे पूर्वींचे लोक समजत असत, पण तो मनु हल्लीं बदलला हल्लीं इंग्रजी भाषा शिकावी तेव्हांच कोठे मान मरातब मिळून सरकार दरबारांत प्रवेश होऊं

ग्रंथ संग्रहालय
सं. ........

लागला; आणि त्यांत सुद्धां वेदशास्त्र तर काय पण अन्या शास्त्र पद्धतीचाही उपयोगी नाहींसा झाला. फल-ज्योतिषाच्या ऐवजीं अस्ट्रॉनमी पुढें आली; आणि भौतिक शास्त्रांपुढें वेदांतशास्त्र दिपून गेलें. रसायनशास्त्र, भूमिती, भूगर्भशास्त्र, यंत्रशास्त्र, इत्यादि नवीन शास्त्रें शिकण्याशिवाय गत्यंतर नाहींसें झालें. अर्थात् नवीन सरकारी शाळा व कॉलेजें त्याच अनुरोधानें स्थापन झाली. तेव्हां जो तो त्यामध्यें जाऊं लागला. त्यामुळें अर्थात् ‘ सरस्वती माय बहिणी ’ इत्यादिकांपासून तों उपनयन, गुरुगृहवास, ब्रह्मचर्यहीं सारींच नामशेष होऊन एका ब्राम्हणजातींत मात्र मुंज ह्मणून तात्पुर्ता संस्कार बाकी राहिला; आणि सारी वहिवाट नव्या विद्यालयांतील चाली रितीप्रमाणें सुरू झाली. ह्याकरितां सांप्रतच्या विद्यार्थ्यांमध्यें कोणकोणते नियम पाळले जातात, त्यांची वागणूक कशी असते, आणि त्यांत ब्रह्मचर्याला साधक बाधक गोष्टी काय काय घडतात व त्या कोणत्या नियमांनीं सुधारतील ह्यांचा विचार करणें अत्यंत अवश्य आहे.

## शक्तिपात—

विद्यार्थी दशेमध्यें विद्या संपादन करावयाची हा मुख्य उद्देश तर खराच; पण त्या बरोबरच इतर साराजन्म सुखावह होण्याचीं साधनें अनुकूल करून घेणें हें त्याहूनही मोठें कर्तव्य आहे. चांगलें गुणसंपादन करणें जितकें

अवश्य आहे, त्याहूनही दुर्गुणांचा संपर्क न होऊं देणें हें अधिक अवश्य आहे. दुर्गुणासंबंधानें विचार केला तर, दुर्व्यसनही त्याची आदिमाता होय. ह्याकरितां विद्यार्थ्यांच्या मनावर दुर्व्यसनाची छायाही पडूं नये म्हणून दक्षता ठेवली पाहिजे; आणि त्यांतूनही सर्व व्यसनांत त्यावेळीं सांभाळावयाचें ह्मणजे स्त्री व्यसन होय. कारण, सर्वांमध्यें काम हा अत्यंत प्रबळ असतो; आणि मनुष्यामध्यें काम संचार होण्याचें मुख्य वय झालें ह्मणजे विद्यार्थ्यांचेंच; म्हणून सर्वांपेक्षां विद्यार्थी वर्गानें ब्रह्मचर्यव्रत पाळणें अत्यंत अवश्य आहे. हें प्राचीन धर्मशास्त्रकारांनीं ठरविलेलें तत्त्व सांप्रत ही सर्वांस मान्यच आहे; पण पूर्वीं तें कडक रितीनें पाळित असत आणि सांप्रत तें तितक्या कडक रितीनें पाळलें जात नाहीं, म्हणूनच विद्यार्थ्यांना अनेक दुर्धर परिणाम भोगावे लागतात.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ साधावयाला, म्हणजे कोणतेंही स्तुत्य कृत्य करावयाला पुरुषांच्या अंगांत मुख्य वीर्य पाहिजे. ज्याच्या अंगांत वीर्याचा सांठा नाहीं, त्याच्या हातून काय होणार ? ह्याकरितां प्रत्येकानें आपआपल्या शरिरांतील वीर्य सतेज राखण्याविषयीं निरंतर जपलें पाहिजे. ज्याच्या अंगांत वीर्य कमी असतें. तो मनुष्य निस्तेज, दुबळा, अशक्त असा होतो; आणि त्याच्या हातून कांहींच होत नाहीं. मग विद्या तरी कशी होणार ? ज्याच्या अंगांत जोमदार

वीर्य असते, तो मनुष्य सतेज व पराक्रमी असतो. त्याला कोणत्याही गोष्टीची खातर वाटत नाहीं. कोणतीहि गोष्ट असो; त्याला ती करण्याची हिंमत असते. म्हणून वीर्याला संस्कृतामध्यें " ओजस् " असें म्हणतात. वीर्य हेंच मानवी शरिरांतील बीजांकुर होय; म्हणून त्यास प्राणापेक्षांही अधिक जमलें पाहिजे. व्यवहारांत सुद्धां पेरावयाच्या धान्यासाठीं शेतकरी लोक बीं म्हणून निराळेंच काढून तें जिवापलीकडे ठेवित असतात; व उपाशी रहाण्याची पाळी आली तरी सुद्धां त्यास हात लावित नाहींत. तें राखून ठेवलेलें बीं किती सतेज व जोमदार असतें बरें ? हें सर्वांच्या पहाण्यांत असतेंच; आणि तें तसें असेल तरच पुढें पीक उत्तम येईल. नाहींतर पिकाचे सर्वोपरी नुकसान झालेंच म्हणून सजावें. तोच नियम मनुष्यमात्रासही लागू आहे. मनुष्याचें वीर्य जर निकोप, शुद्ध व परिपक्व नसेल तर पुढील संततीही चांगली निपजणार नाहीं. पुढील सालीं पेरावयाचें बींच जर एखादा अचरट शेतकरी दळून खावयास लागेल, किंवा त्याला कीड लागण्याचा बंदोबस्त करणार नाहीं, किंवा तें दुसऱ्यालाच देऊन टाकील, तर तो ठार बुडालाच म्हणून समजावें. इतकें जर वनस्पतींच्या बीजाला जपावें लागतें, तर मनुष्याच्या वीर्याबद्दल किती बरें काळजी घेतली पाहिजे ? धान्याचें बीं राखून ठेवणें तर तो दाणा चांगला परिपक्व झालेला पाहिजे; व तो परिपक्व होईपर्यंत

मनुष्यानें दम काढला पाहिजे. मक्याचा किंवा जोंधळ्याचा हुरडा पुरता झाला न झाला तोंच जर तो भाजून खाण्याचा सारखा सपाटा चालविला तर पुढें धान्य तरी काय होणार आणि बीज तरी काय ठेवणार? झाडाला लागलेले आंबे पाड लागण्याच्यापूर्वींच तोडण्याची घाई केली तर पिकलेल्या अमृतफलाचा रसास्वाद मिळणार नाहीं. तीच गोष्ट पुरुषाच्या वीर्याला लागू आहे. त्याचा जर यत्किंचित् अपव्यय होईल तर सर्व शरिराला कीड लागल्यासारखें होऊन मनुष्य निरुपयोगी ठरेल इतकेंच नव्हे, तर एखादेवेळीं तो प्राणासही मुकेल. कारण, पुरुषाच्या शरिरांत जें वीर्य उत्पन्न होतें, तें त्याच्या प्रत्येक अवयवांतील रक्ताचा सत्त्वांश निघून त्याचा एक एक परमाणू बनत असतो. ह्यावरून त्याचें महत्व केवढें आहे हें लक्ष्यांत येईलच. हें वीर्य उत्पन्न होण्याचा काल सुमारें १५ ते २० वर्षांचा असतो; आणि तें वय तर विद्यार्थी स्थितींतच असतें. ह्याकरतां त्या कालांतच वीर्याचा व्यय न होण्याविषयीं फार फार जपावें लागतें. ह्यालाच ब्रह्मचर्याश्रम असें ह्मणतात. पुरुषाच्या वीर्याचा खरा व्यय ह्मणजे प्रजोत्पत्तीकडे लागणें हें तर उघडच आहे. पण तो योग्यकालीं व योग्यस्थलींच झाला पाहिजे. वीर्याचा सद्व्यय म्हणजे योग्यकालीं विवाह झाल्यानंतर धर्मपत्नी ऋतुस्नात होऊन वयांत आल्यावर तिच्याशीं रममाण होणें हा होय. त्याच्यापूर्वीं त्याचा यत्किंचित्‌ही

व्यय होतां कामा नये. हें जें वीर्याचें संरक्षण करणें त्यासच ब्रम्हचर्य व्रत असें म्हणतात. हा ब्रम्हचर्याश्रम धर्म विद्यार्थ्यानें पाळणें अत्यंत अवश्य आहे, हें प्राचीन कालच्या व हल्लींच्या लोकांनाही संमत आहेच; परंतु पूर्वीं विद्यार्थ्यांनीं ब्रम्हचर्य व्रत पाळण्यासाठीं आमच्या प्राचीन शास्त्रकारांनीं कडक नियम केले होते. ते सांप्रत पाळले जात नसल्यामुळें हल्लींच्या विद्यार्थ्यांत ब्रम्हचर्याचा अभाव झाला आहे. ते दिवसें दिवस निस्तेज होत चालले आहेत. ही गोष्ट सहज लक्ष्यांत येण्यासारखी आहे. तथापि कांहीं बाबींचा स्पष्ट उल्लेख करून दाखवूं.

## स्त्री विषयक इच्छा—

सर्व विकारांत काम विकार हा प्रबल आहे. शरीरांत वीर्योत्पत्ति पुरती झाली न झाली, तोंच त्याचा प्रादुर्भाव होऊं लागतो. ह्या करितां त्याचवेळीं तो न होऊं देण्या-विषयीं फार खबरदारी घेतली पाहिजे. सृष्टी नियमाप्रमाणें योग्य कालीं ह्मणजे ऐन तारुण्यांत कामोत्पत्तिही होणा-रच परंतु झाडावर पिकलेलें केळें आणि चुना लावून पिकविलेला घड; ह्यांत जसें महदंतर असतें, त्याचप्रमाणें आपोआप परिपक्क दशेला येणें आणि कृत्रिम साधनानें आणणें ह्यांतही महदंतर आहे. त्याचप्रमाणें ह्या कामो-त्पतीलाही अनेक साधनें कारणीभूत होत असतात; आणि एकदां मनुष्य त्या इच्छेच्या मागें लागला कीं,

त्याला तो विकार अधिक अधिकच जडत जातो; आणि त्यामुळें त्याच्या शरिराची दुर्दशा उडून जातें; मग कशाचें ब्रह्मचर्य आणि कशाचें काय ?

## अविचाराचें फळ—

विद्यार्थ्यांनीं ब्रम्हचर्य व्रत पाळणें अत्यंत अवश्य आहे ही गोष्ट जशी आईबापांना तशीच हल्लींच्या शिक्षकांनाही मान्य आहे; पण तें पाळण्यासारखीं साधनें उभयतांही त्यांस देत नाहींत. इतकेंच नव्हे, तर तें मोडण्याच्याच कामी ते त्यांस मदत करतात; असें म्हणण्यास सुद्धां दिलगिरी वाटते, पण त्यास निरुपाय आहे. इतरांचें असो, व इतर साधनांचेंही असो; परंतु आपल्या मुलानें ब्रम्हचर्याचें नीट संरक्षण करावें असा अभिमान बाळगणारीं खुद्द आईबापेंच, मुलगा पुरता धोतरें नेसावयास लागला न लागला तोंच त्यांच्या दोन हातांचे चार हात करून त्याला एकदांचा चतुर्भुज करून टाकतात, व त्याच्या पायांत पत्नीरूप सव्वामणाची बेडी अडकवितात त्यामुळें मुलगा म्याट्रिक्युलेशनला जातो तोंच बहुधा मुलाचा बाप होऊन जातो ! आणि अर्थात्च नापासाचा शिक्का घेऊन परत येतो. कारण, विषयाची लालची एकदां जडली ह्मणजे त्यापुढें दुसरें कांहीं सुचत नाहींसें होतें. रात्रंदिवस तोच विषय मनांत घोळत राहून अशा गोष्टीसाठीं आईबापांनीं व शिक्षकांनींही फार सावधगिरी ठेवली पाहिजे; पण तितकी ती घेतली जात नाहीं; पण

हा किंवा असलेच दुसरें प्रकार नैसर्गिक आहेत. तेव्हां तेथें फारसा उपाय चालत नाहीं; परंतु विद्येच्या व्यासंगांतच कामोद्दीपनाचे प्रकार काय थोडे असतात ?

उदाहरण, शृंगारिक कविताः—

नोहेचनाभि तरि काय सुरंग आहे ।
रोमावळी गमतसे मज शृंखळा हे ॥
राया असे स्तन तिचे गडघ्यावया तो ।
राजामनोभव उपाय जणों करीतो ॥ १ ॥

हें नलदमयंतीचें वर्णन; अथवा—

प्रिया कुचतटीं जिहींन बहुवार पत्रावळी ।
तिहीं अमित काढिल्या नृप मखांत पत्रावळी ॥

हा केकावलींतील शृंगार; किंवा अशा प्रकारचे ग्राम्य दृष्टांत, वाचून विद्यार्थी वर्गाची वृत्ति बावरून जाते; व ते एकांतांत असले म्हणजे त्याच गोष्टीचें चित्र त्यांच्या डोळ्यापुढें उभें राहतें. अरेबियननाइट, विचित्रपुरी, असल्या गोष्टी वाचल्याशिवाय, व त्यांत तल्लीन झाल्याशिवाय असलेला एक तरी विद्यार्थी कोठें आढळेल काय ? आणि विद्यार्थ्यांनीं असलें शृंगारिक वर्णन वाचल्यावर त्या अप्रतिम सुखाचें मनोराज्य निदान एकांतांत तरी समोर उभे राहिल्यावांचून राहील काय ? कधींहि राहणार नाहीं. ह्याकरितां विद्यार्थ्यांनीं अशा प्रकारचीं शृंगारिक पुस्तकें मुळींच वाचतां कामा नये, अशी सक्त

ताकीद पाहिजे. ह्याशिवाय आणखी एक - विद्यार्थ्यांच्या मनावर कामोद्दीपनाचा पगडा बसविणारी प्रचंडबाब म्हटली म्हणजे शृंगारिक नाटकाची होय. प्रस्तुत कालांत नाटकाचा किती सवंग सुकाळ झाला आहे हें सर्व विश्रुतच आहे; आणि त्यांत संगीताची चटक तर कांहीं विचारूंच नये. ' कुचभल्ली वक्षाला टोंचुनी दुखवी मजला ' इत्यादि पद्यें तरुण जनांस किती भुरळ घालणारीं आहेत, ह्याचें विवरणच केलें पाहिजे असें नाहीं; आणि हीं पद्यें विद्यार्थी तर सारा दिवस गुणगुणत असतात. आणि त्यामुळें त्यांच्या मनावर स्त्रीविषयक संस्कार घडून त्याचा परिणाम अत्यंत विघातक होतो.

## नाटकाचा प्रघात—

विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरींच राहून शिकण्याची सोय फारच थोडी असते. खेडेंगांव असेल तर इंग्रजी शिकण्याकरतां बाहेर गांवीं जावें लागतें. मोठें शहर असेल तर म्याट्रिक्युलेशनपर्यंत हायस्कुलांत अभ्यास होतो. नंतर बी. ए. वगैरे शिकण्याकरितां कॉलेजांत जावें लागतें; व तेथें बोर्डिंगांत राहून शिकावें लागतें. हाच हल्लींच्या काळचा गुरुगृहवास होय; पण तेथें विद्यार्थी बहुतेक स्वतंत्र स्थितींतच असतो म्हटलें तरी चालेल. अशा ठिकाणीं शिक्षकही त्यांच्या खासगी वर्तना संबंधानें घ्यावी तितकी काळजी घेत नाहीं. शिक्षकांचा भर काय तो परीक्षा नापास होऊं नये येवढ्यावरच असतो.

पण अशा ठिकाणीं जर त्यांच्यावर कोणाचाच दाब नसेल तर ती स्वच्छंद होतात, आणि त्यांना अनेक दुर्व्यसनें जडतात. नाटक हें तर दुर्व्यसनाचें केवळ आगर होय; असें असता तें एक मोठें भूषण आहे असाच अलीकडच्या विद्यार्थ्यांच्या मनाचा ग्रह झालेला असतो. कारण, नाट्यकला ही एक मोठ्या बुद्धिमत्तेची दर्शक आहे. तीत कालिदास, भवभूती, शेक्सपीयर वगैरे मोठ-मोठाले नामांकित नाटककार केवळ अजरामर होऊन गेल्याचा ध्वनीही त्यांच्या कानांत गुणगुणत असतो. इतकेंच नव्हे, तर शेक्सपीयर, कालिदास इत्यादिकांचीं नाटकें शाळेंत सुद्धां अभ्यासाला लावतात. तेव्हां नाटक पहावयास जाणें पातक नाहीं येवढेंच नव्हे, तर उलट तें महापुण्यच आहे असा त्यांच्या मनाचा ग्रह असतो. म्हणून ते वारंवार नाटकाला जातात; त्यादृष्टिमुळेंच समारंभ झाले म्हणजे शिक्षक लोक विद्यार्थ्यांकडून शाळेंतच नाटक प्रयोग करवितात. मग त्यासाठीं कित्येक दिवस त्या नाटक प्रयोगाच्या तालमी सुरू होतात. कोणी दुष्यंत होतो, तर कोणी अर्जुन होतो, कोणी प्रतापराव तर कोणी अथेल्लो असे पार्ट वाटून देतात. कोणी यागो होतो. पण अडचण पडते ती शकुंतला, सुभद्रा, मालिका, इत्यादि स्त्रीपार्टाची. हावभाव म्हणजे ॲक्टिंग अगदीं न्याचरल साधलें पाहिजे, म्हणून गुरु किंवा परात्पर गुरु त्या मुलांना स्वतः सगळे नायकांचे

हावभाव शिकवितात. डोळे कसे मोडावेत, मुरका कसा मारावा, आलिंगन कसें द्यावें इत्यादि प्रकार स्वतः करून दाखवितात व त्या बरहुकूम शिष्य तयार करून तें काम बरोबर वठवितात! ब्रह्मचर्याश्रम पाळणाऱ्या विद्यार्थ्यांचीच ही स्थिति पाहून काय बरें वाटावें ? धन्य तो ब्रम्हचर्याश्रम आणि धन्य तो देणारे गुरु! ह्यापेक्षां अधिक काय म्हणावें हेंच समजत नाहीं.

## निजध्यास—

प्रौढ होत चाललेल्या मुलांच्या मनावर नैसर्गिक रितीनें स्त्रीविषयक इच्छा होण्याला आरंभ होत असतो. तो त्याच विषयाचा निजध्यास करूं लागतो. उठतां, बसतां, त्याला ती सुभद्राच डोळ्यापुढें दिसूं लागते. रात्रीं निजलें तर झोप येत नाहीं अभ्यासाकडे लक्ष लागत नाहीं; म्हणून एखादें नाटकाचें पुस्तक घेऊन वाचित पडतो. त्याच चिंतनांत त्यास झोप लागते; आणि तशीच शृंगार चेष्टांचीं स्वप्नें पडतात. ही स्वप्नावस्थेची दुष्ट संवय एकदां जडली कीं, तो दिवसेंदिवस क्षीण होऊं लागतो; ज्याचें मन स्वाधीन रहात नाहीं, तो अशा शृंगारविषयक चिंतनानें सृष्टी नियमाविरुध वर्तन करूं लागतो. त्यामुळें त्याचे अस्थिचर्म मात्र शिल्लक राहतात; आणि ज्या वयांत शरीर जोमदार व सतेज असावयाचें, त्या वयांत तो जरत्कारु, क्षयरोगी व पाप्याचें पितर बनतो.

9269



**हल्लीच्या विद्यार्थ्यांची दुर्दशा—** हें जें आम्ही वर वर्णन दिलें आहे, तें केवळ काल्पनीकच आहे असें मात्र समजूं नये, तर खरोखरी प्रकार तसाच आहे. ह्याला पुरावा पाहिजे असेल तर आर्धी हा आहे कीं, कोणतीही वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें पहा ! त्यांत 'धौतुपौष्टिक' गोळ्यांची जाहिरात! ह्या एकाच औषधावर कैक वैद्य गबर होऊन बसले आहेत. हिंदुस्थानांतील एका प्रख्यात आर्यौषधीच्या कारखान्यांत आम्ही गेलों असतां तेथें ब्रम्हचर्यावर बोलणें निघालें तेव्हां त्याच्या मालकांनीं सुमारें ५०० पत्रांची एक निवडक फाईल आम्हाला दाखविली. त्या सर्वांत हाच मजकूर भरलेला होता. प्रत्येक पत्रांतला आशय बहुधा एकच. त्यापैकीं

एक मासला.

" वि. वि. मी शाळेंतील विद्यार्थी आहे. मला दुष्ट व्यसन जडून ...... कर...... संवय लागली होती. त्यामुळें मी अतिशय खंगलों आहे, व घरून गर्भाधानाचा मुहूर्तही धरल्याबद्दल पत्र आलें आहे, पण मी तेथें जाऊन काय करूं ? आपण माझे मायबाप आहांत. मला कसेंही करून ह्यांतून जीवदान द्या. मी आपले उपकार यथाशक्ति फेडल्यावाचून रहाणार नाहीं. कृपाकरून माझें नांव मात्र गुप्त ठेवा; पत्रव्यवहाराचा परिस्फोट न होईल अशी आशा आहे. इ. इ. "

वैद्यराज ! मी आपल्यापासून चोरून ठेवित नाहीं; कारण, आतां खरे मायबाप आपणच दुसरा मासला. आहां. मला लहानपणापासून मुलींत खेळण्याची संवय होती; मी नाटकें व कादंबऱ्या नेहमी वाची व नाटकें पहावयास जाई. ह्यामुळें भलतीच संवय लागून चेतना नष्ट झाली आहे. ह्याकरितां कृपा करून मला ह्यांतून तारावें. मी पाहिजे तें पथ्य करण्यास तयार आहे. इ. इ. "

हा पत्रव्यवहार केवळ अक्षरशः नाहीं; तरी सारांश एकच आहे. तेव्हां त्यापैकीं कितीएकांवरून आमच्या होतकरू विद्यार्थ्यांची स्थिति कशी आहे, व ते ब्रह्मचर्य कसें पाळतात ह्याची चांगलीच साक्ष पटते.

## ब्रह्मचर्याचें स्वरूप—

येथपर्यंत हल्लींच्या विद्यार्थ्यांच्या ब्रह्मचर्याची कशी राखरांगोळी चालते, ही गोष्ट स्पष्ट करून दिली. आता सारेच विद्यार्थी अशा वर्गांतील असतील असें कोणीही म्हणणार नाहीं हें उघडच आहे, पण अशांचें प्रमाण तरी किती ? असें एखाद्यानें आम्हांस विचारल्यास नक्की आकडा आम्हांसही सांगतां यावयाचा नाहीं हेंही आम्ही प्रांजळपणें कबूल करतों. तरी पण अशा स्थितीच्या विद्यार्थ्यांचा भरणा एकंदरींत बराच असावा ह्यांत

कांहीं शंका नाहीं. यासाठीं ब्रम्हचर्य व्रत जर प्राचीन धर्मशास्त्राच्या नियमाप्रमाणें पाळलें गेले तर वर दर्शविलेलें अनिष्ट प्रकार कधींही व्हावयाचें नाहींत. कारण, त्याचे नियमच तसे कडक आहेत. त्यांपैकीं हल्लींच्या मन्वंतरास सोयीचे असतील, तेवढें सांगूं. ब्रम्हचर्यातही दोन भेद आहेत. पहिलें नैष्ठिक ब्रम्हचर्य आणि दुसरें उपकुर्वाण. व्रतबंध होऊन वेदाध्ययन झाल्यानंतर जो कोणी केवळ परमार्थावरच दृष्टि देऊन गृहस्थाश्रमाच्या म्हणजे लग्न करून संसार करण्याच्या भरीस पडत नाहीं, आजन्म ब्रह्मचारीच राहून सारा जन्म लोककल्याणांत खर्च करतो, त्याला नैष्ठिक ब्रम्हचर्य असें म्हणतात; आणि वेदशास्त्र सर्व पठण करून व यथोचित गुरुदक्षणा देऊन ब्रह्मचर्यव्रताची समाप्ती करून यथाविधीनें स्त्रीचें पाणीग्रहण करून गृहस्थाश्रमी बनतो, म्हणजे संसार करतो, त्याचें नांव उपकुर्वाण. परंतु नैष्ठिक ब्रम्हचारी फारसे कोणी होत नाहींत. कारण, सारेच जर नैष्ठिक ब्रह्मचारी झाले, तर प्रजोत्पत्तीच बंद होऊन सृष्टीची रहाटीही खुंटित होईलं! तरी सुद्धां कांहीं महात्मे जे परोपकारार्थ देह खर्ची घालण्यास तयार होतात ते नैष्ठिक ब्रह्मचर्यच पतकरतात. आद्यश्रीमच्छंकराचार्य, श्रीसमर्थ रामदास, कल्याणस्वामी, उद्धव गोसावी, हल्लींचे श्रीशृंगेरी मठाधिपति, श्रीमद्विवेकानंद-

स्वामी* ही सर्व मंडळी नैष्ठिक ब्रम्हचारी होत; परंतु साधारणपणें उपकुर्वाणि ब्रम्हचर्य हेंच सर्वांच्या उपयोगी आहे.

## कंटकपणा—

ब्रम्हचर्यव्रत म्हणजे कांहीं चैनीचा प्रकार नव्हे, तर शिष्याची पूर्ण कसोटी त्यांत पाहिलेली असते. आतांचा प्रकार म्हटला म्हणजे मुलानें बोर्डिंगांत रहावें व बापानें कर्ज काढून दरमहाचे दरमा त्याला लागतील ते रुपये पाठवावेत, मग हे शिष्य मारताहेत चैन! पण ब्रम्हचर्याचा नियम तसा नाहीं. त्यानें बापाकडून कपर्दिक घेतां कामा नये, तर त्यानें स्वतः मधुकरी मागून रहावें. आतां ही चाल हल्लींही प्रचारांत आणावी कीं काय? असाही प्रश्न उद्भवतो. कित्येक गर्भश्रीमंतलोक असा प्रश्न करावयास चुकावयाचे नाहींत कीं " वः! फारच उत्तम उपदेश केलात! अहो! घरांत सुग्रास अन्न खाणाऱ्या आमच्या मुलानें आम्ही पैसा पुरविण्यास खंबीर असतां काय लोकांच्या दारोदार तुकडे मागून रहावें होय! खासा रोजगार! खासें ब्रम्हचर्य! आणि खासा

---

*ह्याच लेखकांनीं लिहिलेलें "विवेकानंदजीवन" किंमत ८१२ हे पुस्तक पहा. ह्यांत श्रीमद्विवेकानंदस्वामींनीं नैष्ठिक ब्रम्हचर्य धारण करून या अलौकीक कामगिरी बजाविली तिचें मोठ्या बहारीचें दिग्दर्शन केलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ता. ......

धर्म ! " असा प्रश्न करणारांनीं थोडेसें स्पार्टन लोकांच्या इतिहासाकडे लक्ष पुरवावें. आपलीं मुलें सशक्त व्हावीत, काटक व्हावीत, त्यांना चैनीची सवय लागूं नये म्हणून त्यांनीं कायदेच करून टाकले होते. त्यांत सोळा वर्षांचा मुलगा झाला कीं त्यानें घरीं जेवावयाचें नाहीं तर सार्व-जनिक सरकारी वाड्यांत जेवावयास गेलेच पाहिजे, आणि तेथें जेवावयाचा बेत काय ? तर भाकरी व आमटी. तसेंच कोणी पायांत जोडा घालूं नये, असा कायदा होता. निजावयाचें तें घोंगडीवर निजावें. उघडें फिरावें. असे कडक कायदे असत. म्हणजे इकडे जें ब्रह्मचर्यव्रत पाळण्याचे धर्मशास्त्रानें नियम ठर-विले आहेत, तेच नियम त्यांनीं सरकारी कायद्यानेंच ठरवून टाकले होते. अशा प्रकारचें कडकडीत ब्रम्हचर्य-व्रत पाळलें म्हणूनच स्पार्टन लोक येवढ्या पदवीस चढून जगप्रसिद्ध झाले आहेत.

## मधुकरी व भिक्षा—

हा सर्व विचार मनांत आणला म्हणजे मधुकरी मागून ब्रम्हचर्यव्रत पाळणें ह्यांतच विशेष कल्याण आहे असें दिसून येईल इतक्याही उप्पर ज्यांना हें लाजिरवाणें वाटेल त्यांनीं निदान कदान्न भक्षण करणें, चैनी बंद करणें व साध्या रहाणीनें वागणें अशी मुलांस सवय लागेल अशी तजवीज करावी. भिक्षाही किती पवित्र

आहे, व तिच्यापासून किती फायदे आहेत, याचें श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं आपल्या दासबोधांत मोठें रसभरित वर्णन केलें आहे.

मधुकरवृत्ति ही एकपरीनें फार सुखकर आहे. आम-च्यांतील साधुसंतांनीं तिचें फार रसाळ वर्णन केलेलें आहे. मधुकरीचें अन्न फार पवित्र समजतात.

## ब्रह्मचर्याची दिनचर्या—

ब्रह्मचर्यानें पहाटेच उठून थंड पाण्याचें स्नान करावें.

**स्नान.** ज्याना थंडपाण्याचें स्नान सोसत नसेल त्यांनीं ऊन पाण्यानें स्नान करावें. स्नानाचे वेळीं आंग चोळावें म्हणजे मळ निघून आंग स्वच्छ होईल. ज्यांना पोह-ण्याची सवय असेल त्यांनें विहिरींत, तळ्यांत किंवा नदींत जशी सोय असेल त्याप्रमाणें पोहून स्नान करावें म्हणजे पोहण्याच्या योगानें व्यायाम होऊन सहजीं आ-रोग्य प्राप्त होईल. मात्र पूर आलेल्या नदींत कधीं पोहूं नये. कारण एक तर त्या पाण्याला धार फार असते; आणि शिवाय त्यांतून निवडूंगाच्या फण्या, कांटे व माठमोठाले सर्प सुद्धां वहात येत असतात. त्याची मोठी भीति असते. मुंबईसारख्या शहरीं ' स्वीमिंगबाथ ' साठीं म्हणून मुद्दाम लहान लहान कृत्रिम तलाव केलेले असतात, ते पोहावयास उत्तम.

**धोतरें धुणें.**

स्नान झालें कीं, आपलीं धोतरें आपणच धुण्याचा अभ्यास ठेवावा. त्यामुळें शरीरास व्यायाम घडतो, आळस नाहींसा होतो आणि आपल्याला स्वच्छ धोतरें नेसावयास मिळतात. आपलीं धोतरें आपणच स्वच्छ धुवावीत व इतर कपडेही स्वच्छ ठेवावेत. मळकीं वस्त्रें वापरण्याइतकी लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं.

**गंध.**

स्नान झालें कीं कपाळाला गंध लावावें. ज्यांना संध्या, अग्निकार्य, देवपूजा असें कांहीं कर्तव्य असेल त्यांनीं आधीं भस्म लावावें व संध्यावंदन आटोपल्यानंतर गंध लावावें. स्नानानंतर गंधाशिवाय कपाळ ठेवणें हा आपले लोक गौण पक्ष समजतात.

**संध्योपासना.**

ब्राह्मणांनीं संध्या वंदन करणें अत्यंत इष्ट आहे; ब्रह्मचाऱ्यानें अग्निकार्य व ब्रह्मयज्ञ करावा. हें बरें. ब्रह्मयज्ञ केल्याच्या योगानें आपली वंशावळ तरी नेहेमीं आपल्या डोळ्यांसमोर असते. नाहीं तर विलायतेंतील चार्लस रामाच्या बापाचें आजाचें नांव माहित असतें, आणि आपल्या स्वतःच्या आजापणजाचें नांव माहीत नसतें। ही स्थिति अत्यंत लाजिरवाणी होय. दुर-

रोज स्नान झाल्याबरोबर कांहीं स्तोत्रें, रुद्र, सौर, पवमान, निदान गीतेचा एखादा अध्याय किंवा हरिपाठ तरी म्हटल्यावांचून राहूं नये.

नमस्कार.

ब्रम्हचर्यानें दररोज आपल्या शक्तीप्रमाणें एकशें आठ पासून बाराशें पर्यंत तरी सूर्याला नमस्कार अवश्य घालावेत. रिकाम्या बैठकी व जोडच्या पेलीत बसण्यापेक्षां ह्या धार्मिक व्यायमांत दुहेरी काम होतें. नमस्कार घालणाऱ्याला अगदीं हल्लींच्या डंबेलसचें श्रेय मिळतें. ह्मणजे डंबेलसनें जसे दंड वगैरे फिरून स्नायू तयार होतात तसेच स्नायू नमस्कारांनींही तयार होतात. ह्याकरितां नमस्कार हे ब्रम्हचाऱ्यानें कधींही चुकवूं नयेत.

उपहार.

स्नान वगैरे आटोपल्यानंतर थोडासा उपहार करावा. कित्येक तर स्नानाच्या नव्हे तोंड धुवावयाच्या आधींच चहापान करतात! आणि तो चहा सुद्धां घरचा नव्हे, तर बाजारी! गलिच्छ! ही चाल फार वाईट आहे. स्नानापूर्वी तर ब्रम्हचाऱ्यानें कांहीं भक्षण करूं नयेच, तोंडांत पाणी सुद्धां घालूं नये. हें तर काय पण दोन वेळां शिवाय मध्यंतरीं कांहींच खाऊं नये हें उत्तम. फारच वाटलें तर सकाळीं स्नानसंध्या झाल्या-

नंतर थोडेंसें दूध पाहिजे तर त्यांत थोडी साखर घालून द्यावें; परंतु कांहीं न खाणें हा उत्तम पक्ष.

**अभ्यास.** पहाटेस उठून सर्व विधी लौकर आटोपला म्हणजे अभ्यासाला फार उत्तम वेळ सांपडतो. त्यांत आपला नेमलेला अभ्यास करावा किंवा नवीं नवीं पुस्तकें वाचून त्यांचा विचार करावा. त्यांत श्रृंगारिक नाटकें, कादंबऱ्या, असलीं पुस्तकें हातांत सुद्धां धरूं नयेत. त्यांच्या योगानें वेळाचा अपव्यय होतो येवढेंच नव्हे, तर तीं ब्रम्हचर्यव्रतास विघातक होतात.

**दुपारचें भोजन.** विशेषतः विद्यार्थ्यांनीं 'भूक लागल्यावांचून जेऊं नये व झोंप आल्यावांचून निजूं नये' हा नियम पूर्णपणें लक्ष्यांत ठेवावा. जेवावयास बसतांना सोवळ्यांनीं अर्थात् शुचिर्भूतपणानें जेवावयास बसावें. स्नान केल्यावांचून किंवा मळके कपडे घालून किंवा हातपाय धुतल्यावांचून कधीं जेवावयास बसूं नये. जेवतांना थोडे सावकाश व अन्न नीट चाऊन जेवावें. भराभरा कधीं जेऊं नये; किंवा फार रेंगाळतही पण बसूं नये. पदार्थ गोड लागला म्हणून वाजवीपेक्षां फाजील कधीं खाऊं नये. तसेंच खाण्यामध्यें मिजास ठेऊं नये. जाडेंभरडें अन्नच खाण्याची सवय असावी. भूक लागली म्हणजे कसलेंही अन्न असलें तरी चांगलें लागतें; व तें हां हां म्हणतां

पचूनही जातें. पोळी पौष्टिक आहे; किंवा दूध, तूप, पौष्टिक आहे. पण भाजी भाकरी पौष्टिक नाहीं हें म्हणणें व्यर्थ आहे. नुसती चटणी भाकरी किंवा कांदा भाकरी खाऊन राहणारे कुणबी, माळी, महार, केवढे कसे सशक्त असतात हें आपण प्रत्यक्ष पाहतों. ह्यासाठीं नेहमीं मिताहार ठेवावा म्हणजे प्रकृति उत्तम राहते. जेवणाचा मुख्य नियम हा कीं, अमुकच आवड निवड असूं नये जें पानावर पडेल तें खावें. म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें.

**मुखशुद्धि.**

भोजन केल्यानंतर पाहिजे तर एखादें तुळशीपत्र तोंडांत घालावें. कित्येकांना भाजलेले हरभरे, चिंचोके, फळफळावळ वगैरे कांहींना कांहीं तरी खाण्याची सवय असते. असली सवय विद्यार्थ्यांनीं आपल्याला कधींही लावून घेऊं नये.

**शाळेंतील वागणूक.**

शाळेंत जाणें तें अगदीं नियमितवेळीं जावें. कधीं हलगर्जीपणा करूं नये. दहा पांच मिनिटें नेमलेल्या वेळापूर्वी जात असावें; पण तास तास अर्धा अर्धा तास आधीं जाऊन इतर मुलांबरोबर दांडगाई करणें किंवा चकाट्या पिटणें हें ही चांगलें नाहीं! Time is money म्हणजे वेळ हाच पैसा आहे ही इंग्रजी म्हण नेहमीं लक्ष्यांत ठेवून वेळेचा सदुपयोग करित

जावा. दुरुपयोग कधींही करूं नये. शाळेमध्यें मास्तर जें कांहीं सांगतात त्याच्याकडे सारखें लक्ष द्यावें. यत्किंचितही दुर्लक्ष्य करूं नये. तें सांगत असतील त्याविषयाचें नेहमीं नोट बुकावर टांचन करून ठेवावें. नोटबूक व पेनसिल जवळ बाळगावयास कधींही विसरूं नये.

मधली सुट्टी. मधल्या सुट्टीमध्यें बहुतेक मुलें, चुरमुरे; पेरू, केळीं, भजी असले कांहीं तरी पदार्थ घेऊन खात असतात. ही सवय फार वाईट आहे. अगदीं लहानवयाचीं मुलें असून त्यांचीं घरें फार लांब असतील तर त्यांना ही कृति शोभण्यासारखी आहे; परंतु प्रौढ विद्यार्थ्यांना असें करणें उचित नाहीं. त्यांनीं आत्मसंयमन करावयास शिकणें हेंच त्यांचें मुख्य शिक्षण आहे. आणि जिभेला आळा घालणें हाच त्यांचा श्रीगणेशा. जीभ ज्याच्या स्वाधीन झाली. त्याच्या ताब्यांत इतर तें इंद्रिय येण्यास प्रयास पडत नाहीत.

सहल. सायंकाळच्या वेळीं मोकळ्या हवेंत मैल दीड मैल तरी सहल करून आलें ह्मणजे मनास हुषारी वाटते; व्यायाम होतो; अन्न चांगलें पचून भूक वाढते. आणि अन्नाला रुचि लागते. ह्यासाठीं विद्यार्थ्यांनीं निदान उन्हाळ्याच्या दिवसांत तरी चांगल्या स्वच्छ हवेंत नियमानें गांवाच्या बाहेर फिरावयास जात जावें.

**रात्रीचा व्यवसाय.**

सहल करून आलें कीं, हात पाय धुऊन संध्या, स्तोत्र-पाठ, वगैरे करून रात्रीचें भोजन करावें. खरोखर आपल्या या ग्रंथांत ब्रह्मचाऱ्यानें एकभुक्त रहाण्याविषयीं सांगितलें आहे; पण तें हल्लींच्या काळांत लागू पडणार नाहीं. विद्यार्थ्यानें इतका व्यायाम वगैरे केल्या नंतर त्याला सायंकाळीं ही चांगली भूक लागेल. इतकें सर्व आटपून रात्रीं आठ साडे आठ वाजतां मोकळे होतां येईल. नंतर अंथरूण नीट घालावें. विद्यार्थ्यानें—अर्थात् ब्रह्मचाऱ्यानें निजावयास एक सतरंजी व पांघरावयास एखादें लोकरीचें कांबळें वगैरे घ्यावें; फार तर एक उशी ह्यापेक्षां अधिक ऐषआरामाचा बिछाना नसावा.

**रात्रीचा अभ्यास.**

नंतर अभ्यासास लागावें. प्रथम नोट बुक पाहून दिवसां मास्तरांनीं जें जें सांगितलें असेल, त्याचें मनन करावें. नंतर दुसऱ्या दिवसाला काय काय अभ्यास असेल तो क्रमाक्रमानेंच सर्व करून टाकावा.

**निजणें.**

नंतर वेळ सापडल्यास देवाचें नामस्मरण करून निजावें. उशाशीं स्वच्छ पाण्यानें भरलेला तांब्या पंचपात्री ठेवावी. दहा वाजतां निजलें म्हणजे चार वाजतां सहज मनुष्य जागें होतें. निजावयाच्या वेळीं घट्ट लंगोट घालून निजत जावें.

## ब्रह्मचाऱ्याची रहाणी—

**पोषाख.** ब्रह्मचाऱ्याचा किंवा विद्यार्थ्याचा मुख्य उद्देश हाच असावा, कीं, त्यानें छचोर बनतां कामा नये. विद्यार्थ्याचा पोषाख साधाच परंतु टिकाऊ असावा. आंतुन सदरा किंवा बंडी, बाहेरून कोट व डोक्याला टोपी, नेसावयाला साधं धोतर किंवा हल्लीच्या रिवाजाप्रमाणें पाहिजे तर पाटलोण. ब्रह्मचर्य धर्मांत खरोखर जोडा सुद्धां घालूं नये असें आहे. तथापि चालत नसेल तर जोडा घालावयास हरकत नाहीं. शाळेंत जातांना गळ्यांत घालावयाचें तोस्तान (पिशवी) अवश्य असावें. म्हणजे पुस्तकें हरवण्याची भीति नसते सुटसुटीतपणा राहतो. आणि दिसण्यांतही शिस्त दिसते.

**चैनीचा त्याग.** आईबापांना ऐपत असली तरी, निरनिराळें उंची कापडाचें कपडे पगड्या, जरीची उपरणीं, बूट, स्टॉकिंगज् बायसेकल वगैरे चैनीच्या वस्तु कधींही घेऊं नयेत. आईबापांचा एक पैसाही व्यर्थ खर्च करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं, असें मनांत बाळगावें. मी ज्ञान कीर्ति व पैसा मिळविन आणि मग पाहिजे तर चैन करीन, अशी हिंमत धरावी. आईबापांच्या पैशापेक्षां निढळच्या घामानें मिळविलेल्या पैशाची योग्यता फार

मोठी आहे. नाना शंकर शेटच्या चिरंजिवांनीं एकदां मुंबईचे गव्हर्नर फ्रेअर साहेब ह्यांस मोठी मेजवानी केली. जेवणें वगैरे आटोपल्या नंतर गव्हर्नरसाहेबांनीं यजमानास प्रश्न केला कीं, हा वाडा कोणी बांधला ? ' चिरंजीव म्हणाले ' वडिलांनींच बांधलेला आहे. ' बरें, ' हीं हंडया झुंबरें कोणाच्या वेळचीं ? ' घर धनी म्हणाले ' सारीं वडिलांच्याच वेळची. ' ' आणखी हा बागबगीच्या ? ' ' सर्व कांहीं वडिलांनींच करून ठेवलें आहे. ' हें ऐकून गव्हर्नरसाहेब म्हणाले " मी तर आपण काय काय संपादून केलें आहे तें पहाण्यासाठीं आलों होतों, आणि आपण तर कांहींच मिळविलेलें नाहीं हेंच जर मला आधीं समजतें तर मी आलों सुद्धां नसतों. " हें गव्हर्नर साहेबांचे शब्द ऐकून यजमान किती लज्जित झाले असतील हें सांगणें नकोच.

रशियाचा बादशहा पीटरधि ग्रेट हा स्वतः आरमाराचें काम शिकण्यासाठीं वेष पालटून परराज्यांत हमालीचें काम करित असे. त्यानें एके दिवशीं काम करून दहा आण्याचे पैसे मिळविले, आणि त्याचा एक पायांत घालण्यासाठीं बूट खरेदी केला. आणि तो पायांत घालून आपल्या इष्ट मित्रांस दाखवी; आणि ह्मणे " हा माझा जोडा आहे. कारण तो मी निढळच्या घामाचे पैसे मिळवून घेतला आहे." ह्यावरून निढळाच्या घामाच्या पैशाचा त्याला केवढा आनंद व भूषण वाटत

असावें बरें ! ह्या उदाहरणावरून स्वकष्टार्जित पैसे मिळ-विण्याची योग्यता केवढी आहे ही गोष्ट लक्ष्यांत येईलच. म्हणून आईबापांच्या पैशावर विद्यार्थ्यानें चैन मारणें हें निखालस लांछनास्पद आहे, आणि होईल तितकी काटकसर करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. इतकेंच नव्हे, तर आपण झटून अभ्यास करून स्कालरशिप मिळवून होईल तितका आईबापांचा भार कमी केला पाहिजे.

विद्यार्थ्यानें आपण जों पर्यंत ब्रम्हचर्याश्रमांत आहोंत तों पर्यंत-अर्थात् विद्याभ्यास पुरा होईपर्यंत-लग्न न करण्याचा निश्चय

**अविवाहित रहाण्याचा निश्चय.** करावा. कदाचित् आपल्याला अगदीं समजत नव्हतें अशा स्थितींतच लग्न करून ठेवलेलें असेल तर आपला अभ्यास समाप्त होईपर्यंत पत्नीकडे उपभोगाच्या दृष्टीनें पाहूं सुद्धां नये. किंवा हास्य-विनोदादि क्रियाही करूं नयेत. कारण त्याच्या योगानें मन चंचल होऊन अभ्यासांत विघ्न येतें; आणि अकालीं होणारी संतति अशक्त निपजून व आपल्यालाही अशक्तता प्राप्त होते.

ह्या विषयीं डॉ. मॅकनली ह्यांनी लिहिलें आहे:—

" शरीराची पूर्ण वाढ होण्याचे अगोदर केलेल्या संभोगाचे परिणाम दोघांसहि अपायकारक आहेत. त्यांच्या

योगानें पुरुषाचा मर्दपणा व उत्साह कमी होतो आणि त्यामुळें मुलास जन्म देतांना, अप्रौढ स्त्रीस धोका येतो. वयांत आलेल्या आईबापांचे मुलापेक्षां लहान वयांत असलेल्या आईबापांपासून झालेलीं मुलें बहुतकरून कमी सुदृढ असतात. कामीजनांच्या सहवासानें, बिभत्स-वाङ्मयाच्या वाचनानें व कसबिणीच्या मोहानें अविवा-हितांच ठिकाणीं संभोगाविषयीं इच्छा उत्पन्न होते. बालवि-वाहाचा प्रघात असतांहि ह्या देशांत मैथुनसंबंधीं प्रहनचे पुष्कळ प्रकार सुरू आहेत असल्या कृत्यांपासून होणारे दुष्परिणाम व शरीरसंपत्तीला येणारे स्वाभाविक धोके, आपल्या वयांत आलल्या मुलास समजावून सांगणें हें आईबाप व पालक यांचें कर्तव्यकर्म आहे. ''

ब्रह्मचर्याश्रमामध्यें म्हणजे विद्यार्थी स्थितींत आळस, खट्टाळूपणा, बुद्धिमांद्य वगैरे अनेक व्यसन पराङ्मुखता विघ्नें आहेत. पण दुर्व्यसनें जड-पणा इतकें दुर्निवार विघ्न दुसरें कोणतेंच नाहीं. हीं व्यसनें अनेक आहेत. चहा, काफी, सोडा, लमानेड ह्या पासून कांहीं अंमल येत नाहीं व कोणतो ताडाडो होत नाहीं. हें खरें तथापि तें एक व्यसनच होऊन राहतें. त्यामुळें विनाकारण पैसा खर्ची पडतो, आणि गलिच्छपणा वाढतो हल्लीच्या कालांत विद्यार्थ्यांना प्रथम दर्शनी जडणारें व्यसन म्हटलें म्हणजे

विडीचें ! हें व्यसन इतकें फैलावलें आहे कीं, तें पाहून मनाला मोठें आश्चर्य वाटतें. अगदीं लहान पोरापासून तों पोक्त्यापुरवत्या ह्यातान्यापर्यंत तोंडांत विडी ! विडी ओढल्यानें तोंडाला दुर्गंधी येते; ओंठ काळे पडतात; त्यांतही सिगारेट, चिरूट असे चैनीचे प्रकार आहेतच. ही विडीची चटक जरी प्रथम लहानच दिसते तरी ती पुढील सर्व व्यसनांची आई आहे. ही संवय दुःसंगती पासून प्रथम सुरू होते. ह्मणजे कोणी तरी एखादा धूम्र पान भक्त एकदां विडी ओढून पहा. पोटांत दुखण्यावर व अजीर्णावर तर मोठी वस्ताद. हिनें थंडी होत नाहीं वगैरे प्रकार सांगून ती ओढावयास लावतो. आणि ह्या व्यसनाचें असें आहे कीं, तें एकदां जडलें पुरें कीं पुन्हा सुटत म्हणून नाहीं. ह्या करितां असल्या संगती-पासून नेहेमीं दूर असावें. पानतंबाकू खाऊन तोंड लाल करून वारंवार थुंकत बसणें हाही प्रकार त्यांतलाच होय. ह्या करितां ब्रम्हचाऱ्यानें विडा खाऊं नये कीं, सुपारीचें खांड सुद्धां तोंडांत टाकूं नयें, असा नियम केला आहे. पण येथपर्यंत सांगितलेल्या व्यसनांचीं महा-व्यसनांत कोणी गणना करित नाहींत. परंतु ह्या पुढील व्यसनें म्हणजे मनुष्याला शुद्ध पशु बनवून जन्मांतून उठ-वून सोडतात. तीं व्यसनें म्हणजे भांग, गांजा, अफू व दारू हीं होत. हीं व्यसनें किती दुष्ट व घातक आहेत हें प्रत्येक विद्यार्थ्याला निराळें वर्णन करून सांगावयास

पाहिजे असें नाहीं. तेव्हां अशा व्यसनापासून सावध राहण्याविषयीं समंजस विद्यार्थ्यांला आणखी निराळें सांगावयास नको.

पण हीं सारीं व्यसनें कांहींच नव्हत. कारण, ह्या व्यसनांना कांहीं तरी कुसंगतीचें कारण पाहिजे. त्याशिवाय तीं उद्भवत नाहींत; पण ह्यापुढें जें आह्मी व्यसन सांगणार आहों, त्याला दुसऱ्याची संगतीच पाहिजे असें नाहीं. तर तें आपोआपच मनांत उद्भवतें. तें व्यसन कोणतें ? तर परस्त्री व्यसन होय.

सर्व मनोविकारांत कामासारखा दुष्ट व प्रबळ विकार दुसरा कोणताच नाहीं. आणि ब्रम्हचाऱ्याचें म्हणजे विद्यार्थ्यांचें वय तर असें असतें कीं, त्याच वयांत तो काम हळू हळू अंतःकरणांत उत्पन्न होऊन वाढत वाढत त्याचा अतिरेक होण्याचा समय असतो. ह्याकरितां सर्वांपेक्षां त्याला फार जपावें लागतें. विषयाच्या चिंतनानें आपोआप स्वप्नावस्था होते म्हणून लंगोटा गच्च आवळून निजण्याचा परिपाठ ठेवला असतां त्याचा बहुतेक बंदोबस्त होतो. स्वप्नामध्यें जरी ब्रम्हचाऱ्याचा वीर्यपात झाला तरी त्याला धर्म ग्रंथानें प्रायश्चित्त सांगितलें आहे. पण दुसरा त्याहून भयंकर आहे. ब्रम्हचाऱ्याची म्हणजे विद्यार्थ्याची बुद्धि अपरिपक्क असते. त्याचें मन उच्छृंखल बनतें. तो श्रृंगारिक चेष्टा, किंवा

हावभाव पहातो. आणि त्याची इच्छा प्रबळ होऊन तो मुद्दाम वीर्यपात करूं लागतो. ही दुष्ट संवय एकदां लागली कीं त्याच्या साऱ्या जन्माचें मातेरें झालेंच म्हणून समजावें. तो दिवसें दिवस जरत्कारू बनतो. क्षयांची भावना होऊन तो मृत्युपंथास लागतो. ही अवस्था किती भयंकर आहे हें सांगणें नकोच.

आतां ह्याचा जो तिसरा प्रकार आहे, तो ह्याहूनही भयंकर आहे ह्याच्यापुढें पातकाची व दुराचाराची कांहीं सीमा राहिलीच नाहीं. श्रृंगारिक विषयानें, चेष्टेनें एखाद्या ब्रम्हचाऱ्याचें मन चंचल होतें, अनावर होतें, कामाचा वेग सहन करण्या इतकी त्यांच्या मनाची बळकटी नसतें, पोरस्वभाव असतो, मागचा पुढचा विचार रहात नाहीं आणि तो कामांध होऊन पट्कन् एखाद्या वेश्येच्या नादीं लागतो, मग काय विचारावें ? ब्रम्हचर्याचा भंग तर होतोच, पण वर दर्धर व्याधी जडतें, असह्य यातना भोगाव्या लागतात आणि शेवटीं बहुधा मृत्युमुखींच पडावें लागतें ! यत्किंचितही वीर्यपात न होऊं देणें, स्त्रीसंग वर्ज्य करणें, हाच ब्रम्हचर्याचा खरा व मुख्य अर्थ आहे, आणि त्यासाठीं जे कडकडीत नियम पाळावे लागतात, त्याचेंच नांव ब्रम्हचर्यधर्म, त्या सर्वांवरून बोळा फिरतो आणि साऱ्या जन्माची माती होऊन जाते.

( १ ) आतां ब्रह्मचर्यव्रत पाळण्या संबंधानें थोडक्यांत नियम सांगावयाचे तर प्राचीन काळच्या धर्मग्रंथाप्रमाणें पहिली आज्ञा ही कीं, ' सत्यंवद ' म्हणजे सत्य भाषण कर. आणि खरोखर सत्यव्रत पाळणें ह्या सारखें दुसरें पवित्र असें कर्तव्यच कांहीं नाहीं म्हणून मुक्तेश्वरांनीं आपल्या महाभारतांत

## ओव्या.

सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रम्ह ॥
सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्व काळ तिष्ठत ॥ १ ॥
सत्यामृताची कनक वाटी। जोडिली न सांडावी भूतटीं॥
असत्य विषाची नरवटी। पवित्र हातें स्पर्शू नये ॥ २ ॥

असें म्हटलें आहे. कारण सत्य हेंच परमेश्वराचें स्वरूप आहे. येशुख्रिस्ताला जेव्हां धरून नेऊन न्यायाधिशापुढें उभें केलें, तेव्हां न्यायाधिशानें विचारलें ' तूं असें लोकांना भलभलतें कां शिकवितोस? ' येशु म्हणाला ' मी सत्या-करितां शिकवितों. ' तो महासाधु सत्याचें स्वरूप पुढें सांगणार होता परंतु ' सत्य म्हणजे काय ! ' असा उपहासास्पद प्रश्न करून न्यायाधिश साहेब न्यायासनाव-रून उठून गेले. उत्तर ऐकण्यास थांबलेच नाहींत ! नाहीं तर खरोखरच सत्य स्वरूप त्या साक्षात्कारी पुरु-षानें दाखवून दिलें असतें. सत्य हें सूर्यासारखें आहे;

आणि असत्य हें अंधारासारखें आहे. सूर्य नसला म्हणजे काळोख्या रात्रीं मनुष्याला ठेचा खाव्या लागतात. हा अनुभव सर्वांला आहेच. त्या प्रमाणें सत्य नसलें तर मनुष्य केव्हां कोठें व कसा खाड्यांत पडेल ह्याचा नेम नाहीं. ह्या करितां सत्य भाषण व सत्याचरण पाळणें हें ब्रह्मचार्यांचें मुख्य व्रत आहे.

( २ ) दुसरा नियम म्हणजे 'धर्मचर' धर्माप्रमाणें चालणें हा. ह्या जन्म रूप अफाट अरण्यांत धर्म हाच एक रक्षण आहे. स्वधर्मानें जसें आपलें कल्याण होईल तसें इतर कशानेंच होणार नाहीं. म्हणूनच 'स्वधर्मे निधनं श्रेयः' आपल्या धर्म रक्षणासाठीं प्राण खर्ची पडला तरी तो कल्याण कारकच आहे. असें गीतेंत म्हटलें आहे. ज्याचा धर्म सुटेल त्याची अवस्था अफाट जंगलांत वाट चुकल्याप्रमाणें होईल. धर्माचरणानें जसें अंतःकरणाचें समाधान होतें तसें दुसऱ्या कशानेंच होत नाहीं.

( ३ ) ब्रह्मचर्यव्रत किंवा विद्यार्थ्याचा तिसरा नियम म्हणजे 'आचार्योपासन' गुरुभक्ती हा होय. गुरु म्हणजे केवळ विद्या शिकविणारा असा अर्थ नव्हे, तर सर्व वडील व थोर मनुष्यें यांची गणनाही गुरूंतच करतात. सर्वांपेक्षा माता पितरें ही श्रेष्ठ होत. त्यांचा निरंतर सन्मान राखावा. त्यांना वंदन करावें. त्यांची मनोभावें सेवा करावी. विद्यादान करणारा गुरु तर

मातापितराहून अधिक श्रेष्ठ होय. मातापितरें केवळ जन्म देतात; परंतु सद्गुरु हे सर्व जन्माचें सार्थक करून इहलोकीं व परलोकीं शाश्वत सुखाची प्राप्ति करून देतात. म्हणून 'गुरुः साक्षात् परब्रम्ह.' असें म्हटलें आहे. गुरुशी नेहमीं नम्रपणानें वागावें; त्याला सन्मान द्यावा, त्यांचा उपदेश लक्ष लाऊन श्रवण करावा व त्याप्रमाणें वागावें.

( ४ ) ब्रम्हचर्यांचा चवथा नियम म्हणजे 'अहिंसा-व्रत' पाळणें हा. ह्या जगामध्यें दयेसारखें पुण्य नाहीं आणि निष्ठूरपणा सारखें दुसरें पातक नाहीं. 'हिंसा' म्हणजे आपल्यापेक्षां दुर्बळ जिवांचा प्राण घेणें हे तर करूं नयेच; परंतु हिंसा याचा अर्थ येवढाच नव्हे तर कायेनें, वाचेनें किंवा मनानेंही प्राण्यास दुखवूं नये याचें नांव खरोखर अहिंसा. आपल्या शब्दानें सुद्धां कोणाला त्रास न व्हावा ह्या विषयीं जपावें. कोणी आपला अपराध केला, त्रास दिला, तरी आपण लागलीच क्रोधाला वश होऊन त्याला शासन करूं नये. सहनशिलता धरावी. क्षमे सारखें जगांत दुसरें सिद्ध शस्त्र नाहीं. ह्या करितां होईल तितकी इतर प्राण्यावर दयाच करीत जावी.

( ५ ) काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे सहाविकार माहान भयंकर होत. म्हणून त्यांना षड्रिपु असें प्रसिद्ध नांव आहे. त्यापैकीं पहिला तर कामच

असें प्रसिद्ध नांव आहे. त्यापैकीं पहिला शत्रु फारच प्रबल व अनर्थ कारक असून ब्रह्मचर्यावर तर त्याचा विशेषच डोळा असतो. ह्या साठीं त्याच्या विषयीं सावध असावे. त्याचें त्याबद्दल पूर्वी थोडेसें विवेचन केलेंच आहे. म्हणून अधिक सांगणेंचीं येथें अवश्यकता नाहीं; त्याच प्रमाणें बाकीच्या पांच रिपूंनां जिंकण्याकरितां नेहेमीं आत्मसंयमन करित असावे. चुकूं नये.

( ६ ) ब्रम्हचर्याचे सहावें व्रत म्हणजे ' अस्तेय ' हें होय. दुसऱ्याचीं वस्तु त्याला न कळत घेणें ह्याला चोरी म्हणतात. तसें ब्रम्हचर्यानें कधीं करूं नयें चोरीची गणना महत् पातकांत आहे. दुसऱ्याची वस्तु -मग ती अगदीं हलकीं कां असेना—ती घेतली तरी तां चोरीच. ह्या करितां दुसऱ्याच्या पश्चात वस्तुला कधीं चुकून सुद्धां हात लावुं नयें चोरीची वासना उत्पन्न करणारा लोभ. तो लोभ सोडून द्यावा म्हणजे दुसऱ्या वस्तूकडे मन लुब्ध होणार नाहीं.

( ७ ) ब्रम्हचार्याचा सातवा नियम म्हटला म्हणजे ' अपरिग्रह ' हा सांगितलेला आहे. म्हणजे ब्रम्हचर्यानें फाजील वस्तु आपल्या जवळ कधीं बाळगूं नये याचें नांव अपरिग्रह अनावश्यक वस्तु दुसरा कोणी उदार बुद्धीनें देऊं लागला तरी सुद्धां तिचा स्विकार करूं नये. फक्त देहाच्या संरक्षणापुरत्या आणि त्यासुद्धां कमित कमी जितक्या वस्तु [illegible] तील तितक्याच बाळगाव्या. एेष [illegible] केली म्हणजे ही गोष्ट पुष्कळ सुस्पष्ट [illegible] आराम हा जितका वाढवावा तितका वाढतो [illegible] तितका कमी होतो.

मातापितराहून अधिक श्रेष्ठ होय. मातापितरें केवळ जन्म देतात; परंतु सद्गुरु हे सर्व जन्माचें सार्थक करून इहलोकीं व परलोकीं शाश्वत सुखाची प्राप्ति करून देतात. म्हणून 'गुरुः साक्षात् परब्रम्ह.' असें म्हटलें आहे. गुरुशी नेहमीं नम्रपणानें वागावें; त्याला सन्मान द्यावा, त्यांचा उपदेश लक्ष लाऊन श्रवण करावा व त्याप्रमाणें चालावें.

(४) ब्रम्हचर्याचा चवथा नियम म्हणजे 'अहिंसा-व्रत' पाळणें हा. ह्या जगामध्यें दयेसारखें पुण्य नाहीं आणि निष्ठूरपणा सारखें दुसरें पातक नाहीं. 'हिंसा' म्हणजे आपल्यापेक्षां दुर्बळ जिवांचा प्राण घेणें हे तर करूं नयेच; परंतु हिंसा याचा अर्थ येवढाच नव्हे तर कायेनें, वाचेनें किंवा मनानेंही प्राण्यास दुखवूं नये याचें नांव खरोखर अहिंसा. आपल्या शब्दानें सुद्धां कोणाला त्रास न व्हावा ह्या विषयीं जपावें. कोणी आपला अप-राध केला, त्रास दिला, तरी आपण लागलीच क्रोधाला वश होऊन त्याला शासन करूं नये. सहनशिलता धरावी. क्षमे सारखें जगांत दुसरें तिव्र शस्त्र नाहीं. ह्या करितां होईल तितकी इतर प्राण्यावर दयाच करित जावी.

(५) काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे शड्विकार माहान भयंकर होत. ह्मणून त्यांना शड्रिपु असें प्रसिद्ध नांव आहे. त्यांपैकीं पहिला तर कामाचें

असें प्रसिद्ध नांव आहे. त्यापैकीं पहिला शत्रु फारच प्रबल व अनर्थ कारक असून ब्रह्मचर्यावर तर त्याचा विशेषच डोळा असतो. ह्या साठीं त्याच्या विषयीं सावध असावें. त्याचें त्याबद्दल पूर्वी थोडेसें विवेचन केलेंच आहे. म्हणून अधिक सांगणेंची येथें अवश्यकता नाहीं; त्याच प्रमाणें बाकींच्या पांच रिपूंनां जिंकण्याकरितां नेहेमीं आत्मसंयमन करित असावें. चुकूं नये.

( ६ ) ब्रम्हचर्याचें सहावें व्रत म्हणजे ' अस्तेय ' हें होय. दुसऱ्याचीं वस्तु त्याला न कळत घेणें ह्याला चोरी म्हणतात. तसें ब्रम्हचर्यानें कधीं करूं नयें चोरीची गणना महत् पातकांत आहे. दुसऱ्याची वस्तु -मग ती अगदीं हलकीं कां असेना—ती घेतली तरी ती चोरीच. ह्या करितां दुसऱ्याच्या पश्चात वस्तुला कधीं चुकून सुद्धां हात लावूं नयें चोरीची वासना उत्पन्न करणारा लोभ. तो लोभ सोडून द्यावा म्हणजे दुसऱ्या वस्तूकडे मन लुब्ध होणार नाहीं.

( ७ ) ब्रम्हचार्याचा सातवा नियम म्हटला म्हणजे ' अपरिग्रह ' हा सांगितलेला आहे. म्हणजे ब्रम्हचर्यानें फाजील वस्तु आपल्या जवळ कधीं बाळगूं नये याचें नांव अपरिग्रह अनावश्यक वस्तु दुसरा कोणी उदार बुद्धीनें देऊं. लागला तरी सुद्धां तिचा स्विकार करूं नये. फक्त देहाच्या संरक्षणापुरत्या आणि त्यासुद्धां कमित कमी जितक्या वस्तु [illegible] न घेतील तितक्याच बाळगाव्या. ऐष[illegible] केली म्हणजे ही गोष्ट पुष्कळ सुसाध्य आहे [illegible]आराम हा जितका वाढवावा तितका वाढतो [illegible] तितका कमी होतो.

५

मातापितराहून अधिक श्रेष्ठ होय. मातापितरें केवळ जन्म देतात; परंतु सद्गुरु हे सर्व जन्माचें सार्थक करून इहलोकीं व परलोकीं शाश्वत सुखाची प्राप्ति करून देतात. म्हणून 'गुरुः साक्षात् परब्रम्ह.' असें म्हटलें आहे. गुरुशी नेहमीं नम्रपणानें वागावें; त्याला सन्मान द्यावा, त्यांचा उपदेश लक्ष लाऊन श्रवण करावा व त्याप्रमाणें वागावें.

( ४ ) ब्रम्हचर्यांचा चवथा नियम म्हणजे 'अहिंसा-व्रत' पाळणें हा. ह्या जगामध्यें दयेसारखें पुण्य नाहीं आणि निष्ठूरपणा सारखें दुसरें पातक नाहीं. 'हिंसा' म्हणजे आपल्यापेक्षां दुर्बळ जिवांचा प्राण घेणें हे तर करूं नयेच; परंतु हिंसा याचा अर्थ येवढाच नव्हे तर कायेनें, वाचेनें किंवा मनानेंही प्राण्यास दुखवूं नये याचें नांव खरोखर अहिंसा. आपल्या शब्दानें सुद्धां कोणाला त्रास न व्हावा ह्या विषयीं जपावें. कोणी आपला अप-राध केला, त्रास दिला, तरी आपण लागलीच क्रोधाला वश होऊन त्याला शासन करूं नये. सहनशिलता असावी. क्षमे सारखें जगांत दुसरें तिर्व शस्त्र नाहीं. ह्या करितां होईल तितकी इतर प्राण्यावर दयाच करीत जावी.

( ५ ) काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे शड्विकार माहान भयंकर होत. म्हणून त्यांना शड्रिपु असें प्रसिद्ध नांव आहे. त्यापैकीं पहिला तर कामाचें

असें प्रसिद्ध नांव आहे. त्यापैकीं पहिला शत्रु फारच प्रबल व अनर्थ कारक असून ब्रह्मचर्यावर तर त्याचा विशेषच डोळा असतो. ह्या साठीं त्याच्या विषयीं सावध असावें. त्याचें त्याबद्दल पूर्वी थोडेसें विवेचन केलेंच आहे. म्हणून अधिक सांगणेंची येथें अवश्यकता नाहीं; त्याच प्रमाणें बाकींच्या पांच रिपूंनां जिंकण्याकरितां नेहेमीं आत्मसंयमन करित असावें. चुकूं नये.

( ६ ) ब्रम्हचर्याचें सहावें व्रत म्हणजे ' अस्तेय ' हें होय. दुसऱ्याचीं वस्तु त्याला न कळत घेणें ह्याला चोरी म्हणतात. तसें ब्रम्हचर्यानें कधीं करूं नयें चोरीची गणना महत् पातकांत आहे. दुसऱ्याची वस्तु -मग ती आगदीं हलकीं कां असेना—ती घेतली तरी तो चोरीच. ह्या करितां दुसऱ्याच्या पश्चात वस्तुला कधीं चुकून सुद्धां हात लावूं नयें चोरीची वासना उत्पन्न करणारा लोभ. तो लोभ सोडून द्यावा म्हणजे दुसऱ्या वस्तूकडे मन लुब्ध होणार नाहीं.

( ७ ) ब्रम्हचार्याचा सातवा नियम म्हटला म्हणजे ' अपरिग्रह ' हा सांगितलेला आहे. म्हणजे ब्रम्हचर्यानें फाजील वस्तु आपल्या जवळ कधीं बाळगूं नये याचें नांव अपरिग्रह अनावश्यक वस्तु दुसरा कोणी उदार बुद्धीनें देऊं लागला तरी सुद्धां तिचा स्विकार करूं नये. फक्त देहाच्या संरक्षणापुरत्या आणि त्यासुद्धां कमित कमी जितक्या वस्तु [illegible] घेतील तितक्याच बाळगाव्या. [illegible] म्हणजे ही गोष्ट पुष्कळ सुसाध्य आहे [illegible] हा जितका वाढवावा तितका वाढतो [illegible] तितका कमी होतो.

हें मनुष्याच्या दृढ निश्चयावर अवलंबून आहे. म्हणून ब्रम्हचर्यानें मनाचा निर्धार कायम ठेवावा. यांत सर्व कांहीं येतें.

आतां हल्लीच्या कालमन्वंतराप्रमाणें कोण कोणत्या गोष्टी लक्षांत ठेवाव्यांत ह्याचे थोडक्यांत नियम देतो. कारण सारेच नियम सांगू लागलों तर पुष्कळ होतील. तथापि खालील त्रोटक नियम ब्रम्हचाऱ्यानें प्राण गेला तरी मोडूं नयेत आणि हेंच साऱ्या ब्रह्मचर्य धर्माचें सार आहे, ते नियम हे:—

१ परस्त्रीकडे वाईट दृष्टीनें केव्हांहीं पाहूं नये.

२ मनानेंही विषयेंद्रियांचा निरोध करावा.

३ विवाहित असेल त्यानें स्वपत्नीला मित्र समजून तिच्याशीं व्यवहार ठेवावा.

४ शृंगारिक चेष्टा पाहूं नयेत.

५ शृंगारिक काव्यें व पुस्तकें हातांत सुद्धां धरूं नयेत.

६ नायकांत बोलण्याची व बसण्याची संवय ठेवूं नये.

७ तमाशे, नाटकें, वर्ज्य करावींत.

८ ज्या रस्त्यानें वेश्यांचीं घरें असतील तिकडून कधींही फिरकूं नये

९ सदासर्वदा सत्संगतींत व विद्याव्यासंगांत असावें.

१० मित व सात्विक आहार ठेवावा.

११ परमेश्वराचें अखंड चिंतन करावें.

वर सांगितलेले सर्व नियम जो मनोभावें व निश्चयानें पालनग्रहण करील, तोच खरा खरा ब्रम्हचारी होय. व त्यालाच ब्रह्मचर्याचें खरें खरें फल प्राप्त होईल. आणि तोच पुढें किर्तिमान् निपजून उत्तम गृहस्थाश्रम करून सर्व सुखास पात्र होऊन इहपरलोकींही धन्य होईल. ह्यांत तिळमात्र संशय नाहीं.

" ब्रह्मचर्याचें पालन न झालें तर शरीर वीर्यहीन व क्षीण होऊन आयुष्य, तेज, बल, वीर्य, बुद्धि, श्री (शोभा) सौंदर्य, धन, यश, पुण्य व प्रीति हीं सर्व त्याला नाहींशीं होतात. " आपल्या देशामध्यें ब्रह्मचर्यभ्रष्टता अनेक कारणामुळें लवकर होऊं लागली व त्याचीं वर लिहिलेलीं फलें सध्यां लोक भोगित आहेत. याचे पुरावे देण्याची गरज नाहीं इतके ते प्रत्येकाला समजण्यासारखे स्पष्ट आहेत. ह्मणून या अवनतींतून सुटण्यासाठीं ब्रह्मचर्याचें परिपालन होणें अवश्य आहे.

प्राचीन वालखिल्यादिऋषी, तपस्वी, व इतर मुनी यांनीं निश्चयानें कडकडित ब्रह्मचर्य पालन केलें ह्मणून त्यांचें आयुष्य दीर्घ झालें. ज्याला आपलें आयुष्य वाढविणें असेल त्यानें ब्रम्हचर्याचें वरील नियमानुसार पालन करावें. आधुनिक लोकांनीं याकडे अवश्य लक्ष्य द्यावें.

## कुमारिकाब्रह्मचर्य—

सांप्रतकाळीं मुलाप्रमाणें मुलींनीही शाळेंत जाऊन विद्याभ्यास करण्याचा प्रघात पडला आहे. हें जरी

चांगलें आहे, व पुरुषांप्रमाणें, स्त्रियांनांही विद्या व ज्ञान असणें अवश्य आहे, तरी त्यांत आमच्यामतें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं हल्लीं स्त्रियांनीं उच्च प्रतीचे शिक्षण घ्यावें, बी. ए.; एम. ए. व्हावें असें जे मत फैलावलें आहे तें मात्र युक्त नाहीं. स्त्रीशिक्षण मर्यादित पाहिजे. स्त्री व पुरुष हीं संसार रूप रथाचीं दोन चाकें असून तीं समसमान आहेत. त्यांतील एक लहान व एक मोठें. किंवा एक बळकट व एक लेचेपेचें असेल तर कसें चालेल ? अशी एक गोड उपमा दिलेली सर्वत्र ऐकण्यांस येते. पण ही उपमा सर्वथैव लागू पडत नाहीं. कारण, स्त्रियांची व पुरुषांची शरीररचनाच परमेश्वरानें अशी करून ठेविली आहे कीं, तिच्यांत मोठा भेदभाव आहे. दोन्हीं समसमान—तुल्य अशीं नाहींत. एक सशक्त व एक अशक्त; एक स्वावलंबी तर दुसरें परावलंबी; एक काटक, धैर्यवान, साहसी, उग्र; तर दुसरें नाजुक लाजाळू, मर्यादशील, भित्रें व सभ्य. ही फक्त शरीररचनेची गोष्ट झाली; पण दुसरा जो एक धर्म स्त्रियांकडेच ठेवला आहे; व त्याचा क्षणभरही त्रास पुरुषाकडे नाहीं; त्यावरून तर स्त्रियांचा सर्व जन्म गृहकृत्यांत, संसार—कामांत व मुलांच्या जोपासनेंतच जावा असा ईश्वराचा स्पष्ट हेतु दिसतो.

स्त्रियांनीं उच्च शिक्षणांत आपलें आयुष्य घालविणें युक्त दिसत नाहीं, कारण एक तर येवढें शिक्षण घेत ल्यापासून त्यांना कोणताच फायदा नाहीं. नोकरी चाकरी, सरकारी कामें किंवा एखादा मोठा धंदा किंवा लांबचा प्रवास त्यांच्यानें होणें शक्य नाहीं. कारण त्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

त्याच्या मागें लागल्या तर स्त्रियांचा नैसर्गिक व ग्रापंचीक धर्म जो गर्भधारणा, प्रसूति, बालसंगोपन तो कोणी करावा? त्याची वाट काय? जनरीतीप्रमाणें प्रपंच करणें असेल तर स्त्रियांना उच्च शिक्षण केवळ निरुपयोगी होय. दुसरें, उच्च शिक्षण म्हणजे कांहीं जेवण नव्हे. झाडाचीं काडे करावींत रात्रंदिवस जागावें, पुस्तकांवर पुस्तकें पाठ करावींत, तेव्हांच विद्या प्राप्त होत असते. स्त्रिया आधींच अशक्त, कोमल व नाजूक. त्यांनीं जर असे कष्ट केले तर त्या अधिकच अशक्त, दुर्बळ होऊन क्षयाच्या पंथास लागावयाच्या! हें एक झालें. दुसरें, प्रपंचांत आवश्य लागणाऱ्या गोष्टी म्हणजे गृहांतील स्वच्छता, रीतभात, वागणूक, मर्यादा, आदरातिथ्य, स्वयंपाक इत्यादि गोष्टींकडे सहजच दुर्लक्ष होऊन त्यांत त्या अगदीं कुचकामी होतील. ह्या करितां आमच्यामतें ज्या ज्या स्त्रियांना जनरीतीप्रमाणें संसार म्हणून करणें असेल, त्यांनीं उच्च शिक्षण घेण्याच्या भरीस पडूं नये. स्त्री जातीला बेताबाताचें लेखन वाचन आलेलें पुरें आहे.

दुर्दैवानें ज्या कोणी बालविधवाच झाल्या असतील व ज्यांना पुन्हा संसारांत पडण्याची तादृश इच्छा नसेल; व मनानें ज्या खंबीर असतील, त्यांना पाहिजे असल्यास उच्च शिक्षण द्यावें म्हणजे ठीक होईल. कारण अशा स्त्रियांच्या मागें संसाराचा दुसरा व्याप नसतो. पण अशा स्त्रिया फारच थोड्या निघतील, हें उघड आहे. ह्या स्त्रियांचा धर्म म्हणजे ब्रम्हचर्य किंवा संन्यासधर्म होय. तो श्रेष्ठ प्रतींतच गणला पाहिजे हें उघड आहे.

स्त्रियांनीं विद्यार्थी स्थितींत असतांना पुरुषाप्रमाणें ब्रम्हचर्याचे नियम पाळणें अत्यावश्य आहे. त्यांनीं ही पहाटेस उठावें; वेणीफणी करून स्नानविधी वगैरे आटपावें; आपलीं चोळी, लुगडें स्वच्छ आपल्या हातानें धुवावींत; केरवारा काढून जागा स्वच्छ ठेवावी; घरांतील वस्तु व्यवस्थेनें जेथल्या तेथें जागेवर ठेवाव्या. प्रातःकाळीं उठल्यावर देवाची स्तोत्रें, भूपाळ्या वगैरे म्हणाव्यांत. पोषाख नेहमी साधा करावा. साध्या राहणीनें राहावें. हासण्यांत, बोलण्यांत, पाहण्यांत छचोरपणा ठेवूं नये. होता होईल तो पुरुषाचा सहवास टाळावा, पुरुषाशीं एकांतीं भाषण, किंवा त्याच्या बरोबर एकटेच सहल करण्यास जाणें वगैरे गोष्टी निखालस वर्ज्य कराव्यात. आज अमुक पदार्थ खावासा वाटला, उद्या तमुक पदार्थ खावासा वाटला, म्हणून खाणें व जिभेचे कोड पुरविणें ही संवय वाईट. ह्याकरितां कुमारिकांनीं त्याबद्दल विशेष सावध असले पाहिजे. मन आपल्या ताब्यांत ठेवावे. त्याला कधींही उच्छृंखल होऊं देऊं नये. निरंतर इश्वराचे ध्यान करावे, गृहकृत्यें, स्वयंपाक, मुलांचे संगोपन करण्यास शिकावें, पतीस सुख द्यावे. पातीव्रत्य हाच आपला जीव [illegible], प्राण आहे हें लक्ष्यांत ठेवून त्याला जे जे गुण अवश्यक असतील ते ते संपादन करण्याकडे आपल्या मनाचा ओढा ठेवावा. इतकें झालें म्हणजे स्त्रीविद्यार्थीनींचा ब्रह्मचर्याश्रमही सफल झाल्यावांचून राहणार नाहीं.

समाप्त.